# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २** :—मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/१२/२०१० (त्यात २८/१२/२०१०) दिनांक ०३/०१/२०११ रोजीचे व दिनांक ०७/०१/२०११ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव : श्री. प्रभुनाथ गुप्ता

महासभा ठराव क्र. ६३ अ दिनांक : १८/२/२०११

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक दिनांक २०/१२/२०१० (त्यात २८/१२/२०१०) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ८६ पर्यंतचे दिनांक ०३/०१/२०११ रोजीचे विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे व दिनांक ०७/०१/२०११ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :–** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | सेवानिवृत्तीचा | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. इकबाल अहमद शेख | ३१/५/२०१० | श्रीम. अजरूददीन इकबाल शेख | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ६४ **दिनांक:–१८/२/२०११**

सुचकाचे नाव :– श्री.बी.बी.मोरे

अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या श्री. इकबाल अहमद शेख या निवृत्त सफाई कामगाराच्या रिक्त जागेवर त्यांचे नातेवाईक श्रीम. अजरूददीन इकबाल शेख यांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:–** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | सेवानिवृत्तीचा/ मृत्युचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. साहेबराव राजाराम गायकवाड | ३०/०३/२०१० | श्रीम. दुर्गा राविंद्र खर्चन | विवाहीत मुलगी |
| २ | श्री. जयप्रकाश सुमेरा | ३१/०३/२०१० | श्री. प्रदिप जयप्रकाश सुमेरा | मुलगा |
| ३ | श्रीम शालिनी रोहिदास साठे | ३०/०४/२०१० | श्री. प्रकाश रोहिदास साठे | मुलगा |
| ४ | श्री. मधु इतवारी सौदे | ३१/०७/२०१० | श्रीम. राधा मधु सौदे | पत्नी |
| ५ | श्रीम. सीता ईश्वर चौव्हाण | ३१/०५/२०१० | श्री. कालु ईश्वर चौव्हाण | मुलगा |
| ६ | श्रीम. गौरी मौजी परमार | ३०/०४/२०१० | श्री. अनिल मौजी परमार | मुलगा |
| ७ | श्रीम. अनुसया रॉबीन कसबे | ३०/०४/२०१० | श्री. दाविद रॉबीन कसबे | मुलगा |
| ८ | श्री. केशव लिंबाजी कदम | ३१/०५/२०१० | श्रीम. तारा भगवान जाधव | विवाहीत मुलगी |
| ९ | श्री. विष्णु गंगाराम देवकर | ०९/०५/२०१० | श्री. सुनिल विष्णु देवकर | मुलगा |
| १० | श्रीम. रेखा सोनु काबाडिया | ३१/०५/२०१० | श्री. राहुल सोनु काबाडिया | मुलगा |
| ११ | श्री. लालचंद चंदू मोरे | ३०/०६/२०१० | श्री. सुनिल लालचंद मोरे | मुलगा |
| १२ | दिवंगत. रविकुमार मदनलाल चैटोले | २५/५/२०१० | श्री. सिमा रविकुमार चैटोले | पत्नी |
| १३ | श्री. प्रल्हाद साजन बाविस्कर | ३१/०७/२०१० | श्री. खंडु प्रल्हाद बाविस्कर | मुलगा |
| १४ | श्रीम. लीला रामचंद्र घावरी | ३०/०४/२०१० | श्रीम. किरण दिनेश घावरी | सुन |
| १५ | श्री. अर्जुन हिरामण चाबुकस्वार | १६/०२/२०१० | श्री. महेंद्र अर्जुन चाबुकस्वार | मुलगा |
| १६ | श्री. सिताराम भिमसेन कांबळे | ०४/०३/२०१० | श्री. किशोर सिताराम कांबळे | मुलगा |
| १७ | श्री. उत्तम नाना शेरे | ०४/०३/२०१० | श्री. श्रावण उत्तम शेरे | मुलगा |
| १८ | श्री. सतबीर मिठ्ठन मरोठिया | ३१/०१/२०१० | श्री. अनिल सतबीर मरोठिया | मुलगा |
| १९ | श्रीम. दयाबाई दिपचंद छजनाले | १६/०१/२०१० | श्री. अनिल दिपचंद छजनाले | मुलगा |
| २० | दिवगंत. विजय देवकरण करोतिया | ०१/०२/२०१० | श्रीम. सावित्री विजय करोतिया | पत्नी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | श्रीम. रूपवती ओमी मेहरोलिया | ३१/०१/२०१० | श्री. कुमारपाल ओमी मेहरोलिया | मुलगा |
| २२ | दिवगंत. गोजाबाई संभाजी सोनवणे | २९/११/२००८ | श्रीम. सखुबाई संभाजी सोनवणे | मुलगी |
| २३ | श्री. जेलसिंग घासीराम कागडा | ३१/०५/२०१० | श्री. सोनु जेलसिंग कागडा | मुलगा |
| २४ | श्रीम. प्रेमा महावीर चौटेले | ३१/०३/२०१० | श्री. संजय महावीर चौटेले | मुलगा |
| २५ | श्री. वासु हरिसिंग सिलेलान | ३१/०३/२०१० | श्री. अविनाश वासु सिलेलान | मुलगा |
| २६ | श्रीम. छब्बी विठ्ठल भोईर | १६/०२/२०१० | श्री. राजु नारायण गांगुर्डे | नातू |
| २७ | श्रीम. कमला रामआवतार सियोते | ३१/०५/२०१० | श्री. निकेश रामआवतार सियोते | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६५ दिनांकः–१८/२/२०११

सुचकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :– श्री. जे.के.ढोके

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे २७ रिक्त जागांवर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** श्री. मनोज जोधा लोट, फायरमन, अग्निशमन विभाग यांनी किडनी विकाराच्या शस्त्रक्रिया पोटी अनुज्ञेय खर्चापेक्षा जास्त खर्च केलेली रुपये २,०७,३८९/- या रक्कमेस एक विशेष बाब म्हणुन मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्री. मनोज जोधा लोट, फायरमन, यांना किडनी विकाराची शस्त्रक्रिया आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पीटल येथे दि. ०९/०८/२००८ ते दि. २०/०८/२००८ व १२/०१/०९ ते दि. १३/०४/०९ पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांन रूपये २,०७,३८९/—(दोन लाख सात हजार तीनशे एकोणनव्वद फक्त) इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैदयकीय बिले जोडले आहे. तरी त्यांनी २८/०४/२०१०च्या अर्जान्वये वैदयकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

महासभा ठराव क्रमांक ९० दि. १०/०९/२०१० अन्वये महापालिका कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारावर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतीपुर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वेदयकीय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय (१) उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (२) मुत्रपिंड रोपण (३) रक्ताचा कर्करोगृ (४)हृदयावरील शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या उपचाराच्या खर्चाची प्रपिपुर्ती शसकीय रग्णालयाकडून अंकित करण्यात येणाऱ्या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री मनोज जोधा लोट, फायरमन, अग्निशमन विभाग यांनी त्यांच्या किडनिच्या विकारावरील उपचार आदित्य बिर्ला मेमोरिल हॉस्पीटल, पुणे येथे करण्यात आली आहे. तरी श्री. मनोज जोधा लोट, फायरमन, अग्निशमन विभाग यांना एक विशेष बाबा म्हणून रू. २,०७,३८९/—(दोन लाख सात हजार तीनशे एकोणनव्वद फक्त) एवढी रक्कम मंजुर करणेसाठी मा. महासभेपूढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६६** **दिनांक:—१८/२/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. मनोज जोधा लोट, फायरमन, अग्निशमन विभाग यांनी किडनी विकाराच्या शस्त्रक्रिया पोटी अनुज्ञेय खर्चापेक्षा जास्त खर्च केलेली रुपये २,०७,३८९/- या रक्कमेस एक विशेष बाब म्हणुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६ :—** रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाऊन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करणे.

प्रस्तावना

महापालिका मालकीचे गोल मैदान येथिल साधु वासवानी उदयानातील जागेपैकी ५३०० चौ.मी. जागा रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाऊन यांना १० वर्ष कालावधीकरीता उदयानाचा विकास करणे, उदयानाचे जागाचे सौंदर्यीकरण करणे व देखभालीसाठी महासभा ठराव क्र. ६३, दिनांक २०/८/२००३ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेबाबत करारनामा करण्यात आलेला आहे.

करारातील अट क्र. २ मध्ये संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही मार्गाने अन्य पक्षाचे हितसंबंध निर्माण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

परंतु दिनांक ६/१०/२००८ रोजी साधु वासवानी उदयानातील जागा रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट यांना दिनांक २०/२/२००७ रोजी करारनामा करुन भाडयाने दिलेबाबत तक्रार प्राप्त झालेले असल्याने सदर बाबींचा खुलासा करणेबाबत रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांना दिनांक १७/१०/२००८ रोजी आदेशित करण्यात आले होते.

रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी वरील बाबींचा खुलासा सादर न केल्याने त्यांना दिनांक ७/११/२००८ रोजीच्यापत्रान्वये २ दिवसाचे आत खुलासा सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी ८/११/२००८ रोजी सादर केलेला खुलासा मालमत्ता विभागास दिनांक ११/११/२००८ रोजी प्राप्त झालेला असून त्यामध्ये संस्थेने रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन साधु वासवानी उदयानातील जागा इतर कोणासही भाडयाने वापरण्यास दिलेली नसुन ॲम्युजमेंटचे हक्क रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांचेकडेच आहेत. तसेच कार्यरत कर्मचारी सुध्दा संस्थेचेच आहेत. तसेच उदयानास त्यांनी स्वत:चे कुलूप लावलेले असून संपुर्ण जागा त्यांच्या ताब्यात आहे.

रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट किंवा इतर अन्य कोणाबरोबरही करारनामा केलेला नाही. त्यांचे माजी अध्यक्ष श्री. जेटो पुरस्वानी यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट यांचे बरोबर दिनांक २०/२/२००७ रोजी केलेला करारनामा दिनांक २१/२/२००७ रोजी तात्काळ रद्द केलेला आहे. तसेच अशा प्रकारची भविष्यात चुक होणार नाही असे नमुद केले आहे. यावरुन संस्थेने करारातील अट क्र. २ चा भंग केल्याचे लेखी पत्राद्वारे मान्य केल्याचे दिसून येत आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता साधु वासवानी उदयान, गोल मैदान येथिल जागेबाबत रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांचे सोबत केलेल्या करारनाम्याबाबत मा. महासभा पटलावर निर्णयार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६७ — दिनांक:—१८/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाऊन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करण्यास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र.** ७:— श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडुरंग जाधव, मजूर, अनधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदी अन्वये खटला भरण्यास परवानगी देणे.

प्रस्तावना

श्री. मेठवाणी व जाधव हे प्रभाग समिती क्र. ३ येथे कार्यरत असताना त्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात लाचेची मागणी करून लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी रंगेहात पकडल्यामुळे त्यांना सेवेतुन का. आ. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/५०९/०९, दिनांक २६/१०/२०१० च्या आदेशान्वये निलंबीत करणेत आलेले आहे.

उक्त दिनांक १४/१२/१९९५ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय सेवक जेव्हा मुद्येमालासह प्रत्यक्ष लाच घेताना सापडतो व त्यामुळे त्यांना निलंबन केले जाते अशा प्रकरणामध्ये शासकिय सेवकाविरूध्द न्यायालयीन फौजदारी प्रकरण पूर्ण होऊन अंतिम निर्णय होईपर्यंत त्यास सर्व साधारणपणे निलंबीत ठेवण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत.

तसेच दिनांक २० जुलै २००६ च्या शासन निर्णयामध्ये ज्या शासकीय सेवकांच्या प्रकरणामध्ये निलंबनाचा कालावधी फारच मोठा असेल तर शासनाच्या धोरणाचा विचार करून ''अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच'' शासकीय कर्मचाऱ्याच्या निलंबनाबाबत आढावा घेण्यात येईल याबाबत शासन निर्णयामध्ये स्पष्टता नाही यास्तव निलंबनाच्या प्रकरणामधे प्राधिकाऱ्यांने निलंबनाचा आढावा घ्यावा व त्या बाबतची परिस्थिती नमुद करून प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने उचित निर्णय घ्यावा असे आदेश आहेत. तसेच मुद्या क्र. ३ मध्ये ज्या गुन्हयासाठी ०३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी करीता तुरंगवासाची शिक्षा होवु शकते असा दखल पात्र आणि अजामिनपात्र गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा समजण्यात यावा असे नमुद केले आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये विषयांकीत प्रकरणी पोलिस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे यांचेकडील दिनांक ३१/५/२०१० रोजीचे पत्राचे अवलोकन केले असता त्यांनी निलंबीत कर्मचारी श्री. विनोद मेठवानी व श्री. दिलीप जाधव यांना लाच लुचपत प्रकरणी रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरूध्द अभियोग दाखल करणेबाबत परवानगी मागितली आहे.

तरी श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडूरंग जाधव, मजूर हे महापालिकेचे कर्मचारी असुन लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार संबंधीता विरूध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षंम आहे. म्हणून संबंधीत कर्मचाऱ्या विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार खटला दाखल करणे कामी मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६८      दिनांक:—१८/२/२०११

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षंम असून संबंधीत प्रकरणाच्या सर्व कागदपत्र व पुराव्यांच्या सखोल अभ्यासा अंती श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडूरंग जाधव, मजूर या उल्हासनगर महापालिकेच्या कर्मचाऱ्या विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार खटला भरण्यास परवानगी देण्यापूर्वी महापालिका वकिलाचे अभिप्राय घेणे गरजेचे असून त्यांच्या अभिप्रायासह हा विषय पूढच्या सभेत प्रस्तृत करण्यास प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते/ बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :—** स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २०११—१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१०—११ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

**प्रस्तावना**

सन २०१०—२०११ या अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रुपये ५४१.६० कोटी अपेक्षित होते आणि खर्च रुपये ५४१.५३ कोटी अपेक्षित होता . अर्थसंकल्पीय अंदाजप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्ची कपात करणे आवश्यक असून सदर वर्षाकरिता आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाजात येणेप्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती .

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | : | ३२१.९६ कोटी |
| खर्च | : | ३२१.५२ कोटी |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे आयुक्तांनी सन २०११—२०१२ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले होते .

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | : | ३३१.८२ कोटी |
| खर्च | : | ३९३.०३ कोटी |

वित्तीय वर्ष २०११—२०१२ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रुपये ६१.२२ कोटी जकात , मालमत्ता कर , पाणी पट्टी , टॅंकर भाडे व इतर कर व दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समिती पुढे सादर केला होता .

**शिक्षण मंडळाचे सन २०१० — २०११ चे सुधारीत अंदाज :—**

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१०—२०११ चे खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : | २०,१०,७१,२०४ /— |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : | १९,९३,५०,६२२ /— |
| **अखेरची शिल्लक रुपये** | : | १७,२०,५८२/— |

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. १२,३७,१४,३६३/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यात आले होते .

**शिक्षण मंडळाचे सन २०११—२०१२ चे मूळ अंदाज** :—

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे वर्ष २०११—२०१२ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते .

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : | २९,२४,५२,००० /— |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : | २९,२४,५२,००० /— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ७,६१,२७,०००/— शासकीय अनुदान व रक्कम रु. २१,५१,१०,०००/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून तरतूद करण्यात आली होती .

शिक्षण मंडळाचे सन २०१०—२०११ चे सुधारित व २०११—२०१२ चे मूळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी २०१०—२०११ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१०—२०११ चे जमा व खर्चाचे अंदाज , कर व दर वाढीचे प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समिती मार्फत पुढील प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात आले आहेत .

## सन २०१०—२०११ चे सुधारित अंदाजपत्रक :

आयुक्तांनी २०१०—२०११ करिता उत्पन्न व खर्चाचे सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ३२१९५९८ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ३२१५२०६ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयुक्त कार्यालय | +३७३ | १० |
| | | | सामान्य प्रशासन | +१९४६ | १० |
| | | | लेखा परिक्षण | +१११ | १० |
| | | | लेखा विभाग | +६२ | १० |
| | | | विधी विभाग | +३३ | १० |
| | | | आरोग्य विभाग | +४९७० | १० |
| | | | आरोग्य खाते (वैदयकीय विभाग) | +२२२ | १० |
| | | | उदयान विभाग | +१७६ | १० |
| | | | अनाधिकृत बांधकाम विभाग | +५०४ | १० |
| | | | नगररचना विभाग | +७१ | १० |
| | | | भांडार विभाग | +७९ | १० |
| | | | विदयुत विभाग | +३८९ | १० |
| | | | सुरक्षा विभाग | +७३ | ११ |
| | | | अग्निशमन विभाग | +८६ | ११ |
| | | | वाहन विभाग | +२६९ | ११ |
| | | | कर्मचा—यांना गणवेश , रेणकोट, चप्पल, छत्रया इ. पुरविणे . | +५०० | १२ |
| | | | रस्ते दुरूस्ती व निगा | +५००० | १७ |
| | | | इतर खर्च (बांधकाम विभाग) | +१०० | १८ |
| | | | टेंडर व इतर नोटीस जाहिरात खर्च | +१५०० | २० |
| | | | महापालिका इमारत (मुख्यालय) | +२५०० | २३ |
| | | | प्रभाग ७६ विकास कार्य | +१५०० | २४ |
| | | | आरक्षित भुखंडावर तट बांधणी | +५०० | २४ |
| | | | श्री. गणेश देव विर्सजन घाट | +१५०० | २४ |
| | | | वैदयकीय सवलत | +५० | ३६ |
| | | | इतर खर्च (पा.पु.) | +५०० | ३८ |
| | | | मुता—या व शौचालये बांधणे | +२०० | ४३ |
| | | | मुता—या व शौचालये बांधणे (दुर्बल घटक) | +५०० | ४३ |
| | | | प्राथमिक शिक्षण | —२३७१४ | १६ |
| | **एकूण** | ३२१९५९८ | **एकूण** | ३२१५२०६ | |
| | | | **अखेरची शिल्लक** | ४३९२ | |

## महापालिकेचे सन २०११—२०१२ चे मूळ अंदाजपत्रक :

आयुक्तांनी २०११—२०१२ करिता सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ३३१८१८३ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ३९३०३६६ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व साधारण कर | +१२८८०० | उदयाने दुरुस्ती | +७००० | १६ |
| १ | महापालिका शिक्षण कर | +२५२०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा {प्रभाग—१} | +१५३०० | १८ |
| १ | वृक्ष कर | +२८०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा{प्र—१}{दुर्बल घटक} | +१७५०० | १८ |
| १ | पथकर | +३०८०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा {प्रभाग—२} | +१९००० | १८ |
| २ | विकास शुल्क | +४५००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा{प्र—२}{दुर्बल घटक} | +९३०० | १८ |
| २ | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +१४०००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा {प्रभाग—३} | +१७५०० | १९ |
| ३ | रस्ते खोदकाम शुल्क | +४०००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा{प्र—३}{दुर्बल घटक} | +१६८०० | १९ |
| ४ | शिक्षण कर रिबेट | +८४० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेंवा {प्रभाग—४} | +१८९०० | १९ |
| ५ | रोजगार हमी करावरील सुट | +११२ | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा{प्र—४}{दुर्बल घटक} | +१३९०० | १९ |
| ५ | महापालिका मालमत्ता विनियोग | +२००००० | उदयाने बनविणे | +७००० | २३ |
| ७ | स्कायवॉक शिल्लक काम एम.एम.आर.डी.ए अनुदान | +२७९११ | बागेतील खेळणी खरेदी | +१५०० | २३ |
| ८ | शिक्षण कर | +४२००० | नवीन कारंजे बसविणे | +२५०० | २३ |
| ८ | रोजगार हमी कर | +५६०० | आरक्षित भुखंडावर तट बांधणी | +१००० | २४ |
| ३२ | पाणी बिले वसूली { कर } | +१९०००० | महापौर निधी | +५००० | २४ |
| ३२ | पाणी बिले वसूली { पा.पु.} | +२५२००० | उप महापौर निधी | +२५०० | २४ |
| ३२ | पाणी पुरवठा लाभ कर | +१४००० | स्थायी समिती सभापती निधी | +२५०० | २४ |
| ३२ | मल प्रवाह सुविधा लाभकर | +५६०० | नगरसेवक निधी | +२५४०० | २४ |
| ३२ | मल प्रवाह कर | +२५२०० | नगरसेवक निधी {दुर्बल घटक} | +१४००० | २४ |
| | | | जमीन संपादन | +४००० | २५ |
| | | | मनपा इमारती बनविणे (इतर) | +७५०० | २३ |
| | | | प्रवेशव्दार, यात्री निवास, समाज मंदिर, स्पोटर्स कॉ. स्टेज व इतर दुरुस्ती व निगा | +२५०० | २४ |
| | | | आरोग्य केंद्र | +२५०० | २६ |
| | | | स्कायवॉक शिल्लक काम | +२७९११ | २६ |
| | | | नवीन रस्ते (डांबरीकरण) | +४५००० | २४ |
| | | | नवीन रस्ते (सिमेंटकॉक्रिटीकरण) | +१७५००० | २४ |
| | | | शिक्षण कर परतावा | +४२००० | २७ |
| | | | रोजगार हमी कर परतावा | +५६०० | २८ |
| | | | बुस्टर मशीनरी चालवणे खर्च | +१५००० | ३८ |
| | | | ड्रेनेज पंप प्लांट,ड्रेनेज पंप स्टेशन निगा व दुरूस्ती | +१२५०० | ३८ |
| | | | भुयारी गटार जोडणी | +१५०० | ३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | साहित्य निगा | | |
| | | | शौचालय विद्युत देयके | +४००० | ३९ |
| | | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | +१६५०० | ४३ |
| | | | वाहन व मशिनरी खरेदी | +१००० | ४३ |
| | एकूण | ४४९४०४६ | एकूण | ४४८९४७७ | |
| | | | अखेरची शिल्लक | ४५६९ | |

उत्पन्न : ४४९४०४६
खर्च : ४४८९४७७

अखेरची शिल्लक : ४५६९

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१०–२०११ चे सुधारित अंदाज</u> :––

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : २०,१०,७१,२०४ /–
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १९,९३,५०,६२२ /–
अखेरची शिल्लक रुपये : १७,२०,५८२/–

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. १०,००,००,०००/– महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

<u>सन २०११–२०१२ चे मूळ अंदाज</u> :–

आयुक्तांनी २०११–२०१२ करिता शिक्षण मंडळाचे अंदाज सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : २०,३०,८७,५८२ /–
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : २०,०१,५२,००० /–
अखेरची शिल्लक रुपये : २९,३५,५८२/–

उपरोक्त खर्चापैकी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये १२,३५,३१,०००/– अनुदान मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे

१) मालमत्ता कर : (कर योग्य मुल्य पध्दत) प्रचलित करांचे दर मान्य करण्यात येत असुन त्यात प्रस्तावीत कर आकारणी अमान्य करण्यात आली आहे .

२) मालमत्ता कर : भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी प्रस्ताव अमान्य करण्यात आली आहे .

३) पाणी पट्टी दर : प्रचलित करांचे दर मान्य करण्यात येत असुन त्यात प्रस्तावीत दर आकारणी अमान्य करण्यात आली आहे .

४) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात आली आहे .

५) अग्निशमन सेवा शुल्क : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात आली आहे .

६) नागरिकांना पुरविण्यात येणा–या सेवा : मिळकत पत्रक (Property Card) साठी रुपये ५०/– . मान्य करण्यात येत आहे .तसेच मृत्युपत्र पहिल्या ४ प्रति विनामुल्य व नंतरच्या प्रतिप्रत रुपये १०/– शुल्क आकारणेस मान्यता देण्यात आली आहे .

७) वर्ष २०१०–११ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून हे अर्थसहाय महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास शिफारस करण्यात आली आहे.

८) लेखा विभागाचे अभिप्रायांची नोंद घेण्यात आली आहे.

९) वर्ष २००९–१० चे लेखा विवरण पत्र, कर्ज विवरण पत्र व विविध खात्यात जमा रक्कमेची नोंद घेण्यात येत आहे.

१०) जकात दर : अ) प्रचलित करांचे दर मान्य करण्यात येत असुन त्यात प्रस्तावीत फेरबदल अमान्य करण्यात येत आहे.

ब) ग्रे क्लॉथ हा नवीन वर्ग करण्यात येत असुन यासाठी ०.५० टक्के जकात आकारणीचे दर निश्चित करण्यात येत आहेत.

**क)** जकात अभिकर्ता नेमणूकी विषयी शासनामार्फत वेळोवेळी विहित करण्यात आलेले निर्णय / आदेश, व इतर सर्व संबधित बाबींचा सखोल अभ्यास करून उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आयात होणा–या मालावर जकात आकारणी व वसुलीचे कामाची मुदत ३१ मार्च २०११ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ चे कलम ३५ नुसार , आयुक्तांनी कार्यादेश दिल्यापासून प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुलीचे काम अभिकरणामार्फत पार पाडण्यासाठी पुढील प्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

१) <u>किमान देकार रक्कम</u>

**अ)** ज्या दराने वित्तीय वर्ष २०१०–११ ची निविदा मान्य करण्यात आली आहे ती रक्कम ११४,६१,४६,०७१/–

**ब)** १० : नैसर्गिक वाढ ११,४६,१४,६०७/–

<u>किमान देकार रक्कम</u> **१२६,०७,६०,६७८/–**

२) निविदा फॉर्म फी : १०,०००/–

३) इसारा रक्कम (५:) ६,३०,३८,०३४/–

४) सुरक्षा अनामत (१६:) २०,१७,२१,७०८/–
(चार समान रक्कमेची बॅंक गॅरंटी)

५) निविदेचा कालावधी : कार्यादिशाच्या दिनांकापासून एक वर्ष

कामाचे स्वरुप व प्रमाणातील वाढ लक्षात घेता, त्यात बदल होणे आवश्यक आहे. तरी ते पुढीलप्रमाणे सुचविण्यात येत आहे.

१. किमान देकार रक्कम रूपये १२६,०७,६०,६७८/–इसारा रक्कम ६,३०,३८,०३४/– सुरक्षा अनामत रक्कम रूपये २०,१७,२१,७०८/– (राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड किंवा सहकारी बॅंकेमार्फत जारी करण्यात आलेली) व निविदा फॉर्म फी रूपये १०,०००/– असावी. इसा–याची रक्कम निविदा सादर करणेचे दिनांकाचे दोन दिवस अगोदर भरणे आवश्यक आहे

२. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा तसेच एका वर्षात ३० कोटी रक्कमेचा जकात वसुलीचे काम यशस्वीपणे पार पाडण्याचा अनुभव असावा.

३. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झालेल्या मागील ३ वर्षात म्हणजे वर्ष २००७–०८, २००८–०९, २००९–१० मध्ये प्रत्येक वर्षी १२६ कोटी रक्कमेची उलाढाल (Turn over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवष्यक आहे.

4. जकात अभिकर्ता नेमुणीसाठी निविदाधारकाची भांडवली स्थिती (Net Worth) ६० कोटी एवढी असावी व त्यासाठी २००९–.१० या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवष्यक आहे.

५. संयुक्तपणे (Joint venture) सादर केलेली निविदा स्विकारण्यात येवू नये.

6. जकात अभिकर्ता नेमुणीसाठी निविदाधारकाची राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बॅकेमार्फत जारी करण्यात आलेली सॉलवन्सी (Solvancy) १२५ कोटी एवढी असावी.

7. जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदाधारकाने पुर्ण झालेल्या मागील ३ वर्षात म्हणजे वर्ष २००७—०८, २००८—०९, २००९—१० मध्ये प्रत्येक वर्षी एवरेज कॅश ॲक्रयुल (Average Cash Accruals) (Calculated as profit after Tax plus depreciation ) कमीत कमी १० कोटी असावी व त्यासाठी ३ वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवष्यक आहे.

8. निविदाधारकांनी पोलिस खात्याकडून मालक/सर्व भागीदार/ सर्व संचालक यांचे Character Certificate सादर करणे आवश्यक राहील.

9. निविदाधारक कोणत्याही संस्थेमार्फत Black Listed करणेत आला नसावा .

10. महापालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी राज्य शासनाने नगरपालिकांसाठी ठरवून दिलेल्या अशा अटी व शर्तीशी सुसंगत असलेल्या अटी व शर्ती निविदेत समाविष्ट करण्यात यावी .

वर्ष २०११—२०१२ चे अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या विविध लेखा शीर्षातून पुढील प्रमाणे कामे हाती घेण्यास शिफारस करण्यात आली आहे .

| अ.क्र. | नवीन शौचालय | समाज मंदिर | हेल्थ सेंटर | संरक्षण भिंत |
|---|---|---|---|---|
| १ | शिवनगर शाखेसमोरील शौचालय, वार्ड क्र. ४८ | शिवनगर, भालेराव बंगला येथे समाजमंदिर व व्यायाम शाळाबांधणे वार्ड क्र. ४९ | गोल मैदान साधुवासवानी उद्यान हेल्थ सेंटर | शिवनेरी, धोबीघाट, स्वामी विवेकानंद शाखेजवळ, संरक्षण भिंत बांधणे, वार्ड क्र. ०३ |
| २ | संतोषनगर शिवसेना शाखेजवळील पुरूष शौचालय, वार्ड क्र. ४९ | कामेश्वर महादेव मंदिर जवळ समाजमंदिर बांधणे वार्ड क्र. ७६ | | |
| ३ | संतोषनगर शिवसेना शाखेजवळील महिला शौचालय वार्ड क्र. ५१ | आनंता भोईर यांचे घरासमोर समाज मंदिर बांधणे, वार्ड क्र. ७६ | | |
| ४ | | बर्नलवाला खत्ता बॅरेक १८९२ समोर समाजमंदिर बांधणे वार्ड क्र. ७० | | |
| ५ | मद्रासीपाडा येथे १० शिटचे शौचालय बांधणे | मद्रासीपाडा येथील गणेश मंदीराजवळील समाजमंदिराचे उर्वरीत कामाकरीता वार्ड क्रमांक ५२ | | |
| ६ | भरतनगर नं. २ येथे १० शिटचे शौचालय बनविणे वार्ड क्र १० | भरतनगर येथे समाज मंदिर बांधणे, वार्ड क्र. ६४ | | |
| ७ | ढालेपाडा येथे १० शिटचे शौचालय बांधणे | तक्षशिला हायस्कुल जवळ समाजमंदिर बांधणे, वार्ड क्र. ६४ | | |
| ८ | वार्ड क्र १८ मध्ये सरकारी शौचालय बांधणे | वार्ड क्र. १८ बॅरेक नं. १६७ च्या जवळ समाजमंदिर बांधणे | | |
| ९ | शिवसेना शाखे बसस्टॉप बॅ नं. १०९, ११० जवळ सरकारी शौचालय बांधणे | बॅरेक नं. १७२ महेश सोसायटी जवळ समाजमंदिर बांधणे | | |
| १० | वार्ड क्र. ५० मध्ये सरकारी शौचालय बांधणे | बॅरेक नं. १०४ साठी समाजमंदिर बांधणे | | |
| ११ | वार्ड क्र. ३० एकता कॉलनी मध्ये सरकारी शौचालय बांधणे | बॅरेक नं. ९५० वार्ड क्र ३० मध्ये समाजमंदिर बांधणे | | |
| १२ | वार्ड ९ रमाबाई आंबेडकर नगर | बॅरेक नं. ९३९ वार्ड | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४ शिटचे शौचालय | क्र ३० मध्ये समाजमंदिर बांधणे | | |
| १३ | उल्हास विदयाल जवळ, ८ शिटचे शौचालय बांधणे, वार्ड क्र. ५१ | वार्ड क्र ५१ मध्ये समाजमंदिर बांधणे | | |
| १४ | बसवेश्वर मंदिरमागे हनुमान नगर येथे शौचालय बांधणे वार्ड क्र ०३ | वार्ड क्र ५८ मध्ये समाजमंदिर बांधणे | | |
| १५ | आंबेडकर नगर येथे १० शिटचे शौचालय | ब्लॉक नं ७४५ प्रेमनगर टेकडी जवळ समाजमंदिर बांधणे | | |
| १६ | वार्ड क्र ७१ गौतम नगर कौलास कॉलनी येथे शौचालय बनविणे | बॅरेक नं. ९४५ जवळ समाजमंदिर वार्ड क्र ३० मध्ये समाजमंदिर बांधणे | | |
| १७ | वार्ड ४ सहयाद्री नगर शिवमंदिर मागे, शौचालय बांधणे | वार्ड १६ वाल्मीकी नगर | | |
| १८ | वार्ड ५ स्वाती हॉटेल शहाड मागे शौचालय बांधणे | वार्ड ४४ बॅ नं. १०६४ समोर | | |
| १९ | भाजी मार्केट दुधनाका शौचालय बांधणे वार्ड क्र ७० | वार्ड ४४ बॅ नं. ११०३ समोर | | |
| २० | | वार्ड ५९ बॅ नं. १६७७ समोर | | |
| २१ | | वार्ड ६० बॅ नं. १६९४ समोर समाजमंदिराचे नुतणीकरण | | |
| २२ | | वार्ड १२ महात्मा फुले गर | | |
| २३ | | वार्ड १४ हॉलीवुड अपार्टमेंटच्या मागे समाजमंदिराचे नुतणीकरण | | |
| २४ | | वार्ड १४ विलायतराय अपार्टमेंट समोर | | |
| २५ | | वार्ड ९ रमाबाई आंबेडकर नगर | | |
| २६ | | गौबाई पाडा येथे समाजमंदिर बांधणे | | |
| २७ | | वार्ड क्र ७५ आंबेडकर नगर येथे समाजमंदिर बांधणे | | |
| २८ | | बॅ नं. १९०३ समोर जुने शौचालय निष्कासित करून समाज मंदिर बांधणे, वार्ड क्र ७१ | | |
| २९ | | लालचक्की शिवमार्ग येथे समाजमंदिर बांधणे, वार्ड क्र ६२ | | |
| ३० | | वार्ड ४ सहयाद्री कॉलनी, समाजमंदिर बांधणे | | |
| ३१ | | वार्ड ५ वाल्मीकी नगर समाजमंदिर बांधणे | | |
| ३२ | | संतोषनगर प्रभाग क्र. ४९ येथील समाजमंदिर १ मजला वाढविणे | | |
| ३३ | | बर्नलवाला खाता बॅरेक नं. १८९२ समोर, समाजमंदिर बांधणे, वार्ड क्र ७० | | |

महासभा ठराव क्रमांक : ६९ दिनांक : १८/२/२०११

सुचकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक १०८ दिनांक १०/२/२०११ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २०११—२०१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास, सन २०१०—२०११ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबींकरिता पुढील प्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

१) मालमत्ता कर : (कर योग्य मुल्य पध्दत) प्रचलित करांचे दर मान्य करण्यात येत असुन त्यात प्रस्तावीत कर आकारणी स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अमान्य करीत आहे .

२) मालमत्ता कर : भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी प्रस्ताव स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अमान्य करीत आहे

३) पाणी पट्‌टी दर : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे.

४) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे .

५) अग्निशमन सेवा शुल्क : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे .

६) नागरिकांना पुरविण्यात येणा—या सेवा : मिळकत पत्रक (**Property Card**) साठी रुपये ५०/— . मान्य करण्यात येत आहे .तसेच मृत्युपत्र पहिल्या ४ प्रति विनामुल्य व नंतरच्या प्रतिप्रत रुपये १०/— शुल्क आकारणेस स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे .

७) वर्ष २०१०—११ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून हे अर्थसहाय महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास मंजुरी देत आहे .

८) लेखा विभागाचे अभिप्रायांची नोंद घेण्यात येत आहे.

९) वर्ष २००९—१० चे लेखा विवरण पत्र, कर्ज विवरण पत्र व विविध खात्यात जमा रक्कमेची नोंद घेण्यात येत आहे.

१०) जकात दर : अ) प्रचलित करांचे दर मान्य करण्यात येत असुन त्यात प्रस्तावीत फेरबदल अमान्य करण्यात येत आहे.

ब)जकात अभिकर्ता नेमणूकी विषयी शासनामार्फत वेळोवेळी विहित करण्यात आलेले निर्णय / आदेश, व इतर सर्व संबधित बाबींचा सखोल अभ्यास करून उल्हासनगर महानगरपालिका हद्‌दीत आयात होणा—या मालावर जकात आकारणी व वसुलीचे कामाची मुदत ३१ मार्च २०११ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ चे कलम ३५ नुसार , आयुक्तांनी कार्यादेश दिल्यापासून प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुलीचे काम अभिकरणामार्फत पार पाडण्यासाठी स्थायी समितीने शिफारस केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे मंजुरी देत आहे.

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१०—२०११ चे सुधारित व सन २०११—२०१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज</u> :

महापालिका शिक्षण मंडळाचे सन २०१०—२०११ चे सुधारित व सन २०११—२०१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

## महानगरपालिकेचे सन २०१०—२०११ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज :

स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे सन २०११—२०१२ करिता उत्पन्न रुपये ३२१.९६ कोटी व खर्च रुपये ३२१.५२ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

## महानगरपालिकेचे सन २०११—२०१२ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज :

स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे सन २०११—२०१२ करिता उत्पन्न रुपये ४५०.४१ कोटी व खर्च रुपये ४४९.९५ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्वीकृती देत आहे.

**परंतु**

सन २०११—१२ चे अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या विविध लेखा शीर्षातून स्थायी समितीने सुचविलेले व पुढील कामे हाती घेण्यात यावे .

| अ.क्र. | लेखाशीर्ष | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | समाज मंदिर बनविणे | १) प्रभाग — २१ मध्ये बॅ.न. २११ ते २१३ तेथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | २) प्रभाग — ५५ मधील साईबाबा नगर येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ३) प्रभाग — ६५ मधील समतानगर येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ४) प्रभाग — ०६ मधील बाळकृष्ण नगर येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ५) प्रभाग — ३५ मध्ये झुलेलाल शाळेशेजारी, बेफीकरी चौक, उल्हासनगर २ येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ६) प्रभाग — २८ मध्ये पचंशिल नगर येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ७) प्रभाग — २५ मध्ये बॅ.नं. ४०४ येथे समाजमंदीर बाधंणे. |
| | | ८) प्रभाग — ५० मध्ये समाजमंदीर बाधंणे. |
| | | ९) प्रभाग — २७ मधील टिळक कॉलनी येथे समाजमंदीर बाधंणे. |
| २ | शौचालय बांधणे | १) प्रभाग — ४१ मध्ये शास्त्रीनगर, बौधविहार शेजारी १० सीटचे शौचालय बाधंणे |
| | | २) प्रभाग — ४१ मध्ये बालकनजी बारी, संतोषीमाता मंदीराच्या मागे १० सीटचे शौचालय बाधंणे |
| | | ३) प्रभाग — ४६ मध्ये गणेशनगर येथे शौचालय बाधंणे |
| | | ४) प्रभाग — ४६ मध्ये शिवाजीनगर शौचालय बाधंणे |

| | | |
|---|---|---|
| ३ | हेल्थ सेटंर बाधंणे | १) व्ही.टी.सी. मैदानाचे आधारकेन्द्रात रुपांतर करणे. |
| | | २) भैयासाहेब आंबेडकर नगर येथील टेकडीवर हेल्थ सेंटर बांधणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ३) सम्राट अशोक नगर येथे हेल्थ सेंटर बांधणे. |
| | | ४) महापालिका मुख्यालयाच्या पाठीमागे हेल्थ सेंटर बांधणे. |

१) जकात निविदा अर्जाची (फॉर्मची) फी रु. १०,०००/— ऐवजी रु.२५,०००/— ठेवण्यात यावी.

२) जकात निविदेसाठी पथकर व इतर वसुलीचा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

३) स्थायी समिती ठराव क्र.१०८ दिनांक १०/०२/२०११ व्दारे ग्रे क्लॉथ वर जकात दर कमी न करता पूर्वी लागू असलेल्या जकात दर कायम राहील.

४) नामनिर्देशित पालिका सदस्यांना नगरसेवक निधी कोणत्याही क्षेत्रात वापरता येईल व त्याप्रयोजनार्थ पूर्वीचा महासभा ठराव क्र. २६ दिनांक २९/०९/२००८ अन्वये निर्वाचित पालिका सदस्यांचा नाहरकत दाखला घेण्याच्या निबंर्धामध्ये सुट देणे व त्याप्रयोजनार्थ सदरचा ठराव रदद् मानन्यात येईल.

५) प्रभाग क्र. ८,३७,४३,५४ व ६३ मध्ये प्रत्येकी रु. ९ लाख ऐवजी रु. २४ लाख खर्चाचे अनुदान मान्य करण्यात येत आहे.

**नविन शौचालयः—**

स्थायी समिती ठराव क्र. १०८ दिनांक १०/०२/२०११ मध्ये उल्लेख केलेल्या शिवनगर शाखेसमोरील शौचालय प्रभाग क्र. ४८ ऐवजी प्रभाग क्र. २९ असे मानन्यात येईल. आणि संतोषनगर शिवसेना शाखेजवळील महिला शौचालय प्रभाग क्र. ५१ ऐवजी प्रभाग क्र. ४९ असे मानन्यात येईल. तसेच शिवनगर, भालेराव बंगला येथे समाज मंदीर व व्यायाम शाळा बांधणे प्रभाग क्र. ३९ ऐवजी प्रभाग क्र. ४८ असे मानन्यात येईल.

मालमत्ता कराचे उत्पन्न या शिर्षाखाली रु. एक करोड एक लाख वाढ दाखविण्यात येईल. व गोलमैदान व्यतिरिक्त प्रभाग समिती क्र. १ ते ४ येथे चार नविन हेल्थ सेंटर बांधण्याकामी प्रत्येकी रु. सहा लाख पंचवीस हजार खर्चाचे अनुदानास मंजुरी देत आहे.

वरील सर्व बाबींच्या तरतूदीच्या प्रयोजनासाठी वरील अंदाजपत्रक छापून प्रत्येक महापालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुसंख्येने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

महासभा ठराव क्र. :— ७० अ                                        दिनांक : १७/३/२०११

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १**:— उल्हासनगर महापालिका क्षेत्रात विदयुत विभागामार्फत पथदिव्यांमध्ये उर्जा बचतीसाठी सयंत्रे अस्थापित करणे व महाऊर्जा व शासन योजनेअंतर्गत २५ लाखापर्यंत अर्थसहाय्याचा लाभ घेण्यास मान्यता देणे.

**विषय क्र. २**:— उल्हासनगर महानगरपालिकेने सपना गार्डन उल्हासनगर—३ येथे श्रीमती कमला केवलराम ठाकुर या नावाने बांधलेले वाचनालय देखभाल दुरुस्ती व वापर प्रयोजनार्थ बिनाभाडे योग्य संस्थेशी जागा वापर परवाना करार करण्यास मान्यता

देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १९/१/२०११ (त्यात १८/२/२०११), दिनांक १८/०२/२०११ व दिनांक ८/३/२०११ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव : श्रीमती सुमन शेळके

<u>महासभा ठराव क्र.</u> ७० ब <u>दिनांक : १७/३/२०११</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १९/१/२०११ (त्यात १८/२/२०११) रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते ३८ पर्यंतचे, दिनांक १८/०२/२०११ रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे व दिनांक ८/३/२०११ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३** :— वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | सेवानिवृत्तीचा | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. बर्फी शिसपाल | २१/२/२०१० | श्री. प्रकाश मोतीराम टांक | जावई |
| २ | श्रीम. चिमणबाई भिशन भगवाने | ३०/४/२०१० | श्री. सतिश भिशन भगवाने | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७१

दिनांक:—१७/३/२०११

सुचकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास रिक्त जागांवर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:—** श्रीमती चतुरबाई सोना पालांदे, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५व ६६ अन्वये, अनुक्रमे ३०वर्ष व २०वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. चतुराबाई सोना पालांदे | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/१०/२०१० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७२ <u>दिनांक:—१७/३/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती चतुरबाई सोना पालांदे, सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** श्रीमती शांती कंच्छी टांक, सफाई कामगार यांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | एकुण सेवा | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. शांती कंच्छी टांक | १२ वर्षापेक्षा जास्त | ०९/०६/२०१० |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७३ <u>दिनांक:—१७/३/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती चैनानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती शांती कंच्छी टांक, सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन सेवा निवृत्ती देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६:—** श्री. गोपीनाथ फुलोरे, मजुर यांना महापालिका सेवेत दिनांक ११/२/२०१० पासुन पुढील सहा

महिन्याकरीता मुदतवाढ देणे

प्रस्तावना

मा. दिवाणी न्यायालय, कल्याण येथील सह न्यायाधीष यांचेकडील दिनांक २७/९/२००७ व ३१/३/२०१० रोजीचे आदेश आणि मा. महासभा ठराव क्र. ८३, दिनांक १८/२/२००६ अन्वये पाले ते गायकवाडा पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा अतंर्गत जलवाहीनीचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणारे श्री. गोपीनाथ फुलोरे यांना पाणी पुरवठा विभागात मंजुर/वॉलमन या पदी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरूपात अस्थायी पदावर (वर्ग—४) नेमणूक दिलेली आहे.

त्यास अनुसरून सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ८ एप्रिल, २०१० रोजीच्या आदेशानुसार श्री. गोपीनाथ फुलोरे यांना उल्हासनगर महानगरपालिकेत सेवेत तात्पुरत्या स्वरूपात पाणी पुरवठा विभागात (वर्ग—४ चे) 'मजुर/वॉलमन' या पदी अस्थायी पदावर नेमणूक देण्यात आली होती. सदर मुदत दिनांक ७/१०/२०१० रोजी संपुष्टात आलेली आहे.

तरी श्री. गोपीनाथ फुलोरे यांची सेवा दिनांक ७/१०/२०१० रोजी संपुष्टात आल्याने दिनांक ८/१०/२०१० रोजी ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक ९/१०/२०१० रोजी आणि रविवार दिनांक १०/१०/२०१० रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दिनांक ११/१०/२०१० पासुन पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार नियुक्तीचे नवीकरणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणुन मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७४ दिनांक:—१७/३/२०११

सुचकाचे नाव :– श्रीमती ज्योती चैनानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गोपीनाथ फुलोरे, मजुर यांना महापालिका सेवेत दिनांक ११/२/२०१० पासुन पुढील सहा महिन्याकरीता मुदतवाढ देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

प्रस्तावकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडील दिनांक ११/३/२०११ च्या पत्रान्वये लोकभारती गट नोंदणीमध्ये बदल झाल्याने श्री. सुरेश जाधव व इतर ७ सदस्यांसह लोकभारतीपक्षाची स्वतंत्र आघाडी, गट नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदरहु पत्रास श्री. जीवन इदनानी यांचेतर्फे आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यांत आलेली आहे. त्या याचिकेत दिनांक १७/३/२०११ च्या आदेशाद्वारे सदरहु याचिकेवरील अंतिम सुनावणी दिनांक ३०/३/२०११ रोजी ठेवण्यांत आलेली आहे त्यामध्ये होणा–या अंतिम आदेशापर्यंत लोकभारती गट नोंदणी मध्ये बदल झाल्याने दिनांक १ एप्रिल २०११ पासून ८ रिक्त होणा–या स्थायी समिती सदस्यांच्या जागा भरण्याच्या विषय क्र. ७ बद्दल निर्णय न करता ही सभा स्थगित करण्यास महासभेपूढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ७४ अ</u> <u>दिनांक :–</u>
<u>१७/३/२०११</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता या सभेच्या विषय क्र. ७ वरील निर्णय पुढे ढकलण्याप्रयोजनार्थ सभा स्थगित करण्यास मान्यता देत नाही.

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ७:—** दिनांक १ एप्रिल २०११ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

**प्रस्तावना**

महापालिकेच्या स्थायी समितीतून दिनाक १.४.११ पासुन निवृत्त होणा—या ८ सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे होते.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७/७६ X १६ | = ३.५७ | (५) | कॉंग्रेस | ६/७६ X १६ | = १.२६ |
| (२) | शिवसेना | १७/७६ X १६ | = ३.५७ | (६) | आरपीआय | ५/७६ X १६ | = १.२६ |
| (३) | रा.का.पा. | १६/७६ X १६ | = ३.३६ | (७) | म.न.से. | २/७६ X १६ | = ०.४२ |
| (४) | भाजपा | १२/७६ X १६ | = २.५२ | (८) | अपक्ष | १/७६ X १६ | = ०.२१ |

कारण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) अनुसार जेव्हा १६ पदे रिक्त होती त्यावेळी स्थायी समितीवर प्रत्येक गटाचे प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे होते.

| लोकभारती | शिवसेना | रॉकापा | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | ३ | १ | १ | ० | १६ |

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे १६ सदस्यांपैकी ८ सदस्य ०१ एप्रिल, २०११ पासून आळीपाळीने निवृत्त होणार आहेत त्यांची नावे व पक्ष इत्यादीचे विवरण खालीलप्रमाणे.............

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय पवार | लोकभारती | २ |
| २ | श्री. दिलीप जग्यासी | लोकभारती | |
| ३ | श्रीमती पंचशिला पवार | आरपीआय | १ |
| ४ | श्री. जमनादास पुरस्वानी | भाजपा | २ |
| ५ | श्रीमती जया माखिजा | भाजपा | |
| ६ | श्री. रमेश चव्हाण | शिवसेना | २ |
| ७ | श्रीमती मिनाताई सोनेजी | शिवसेना | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री. रविंद्र बागुल | राष्ट्रवादी कॉंग्रेस | १ |

स्थायी समितीचे उर्वरित ८ सदस्यांची नावे व त्यांचा पक्ष इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. जीवन इदनानी | लोकभारती | २ |
| २ | श्री. अंकुश म्हस्के | लोकभारती | |
| ३ | डॉ. निना नाथानी | भाजपा | १ |
| ४ | श्री. सुंदर मंगतानी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ |
| ५ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | शिवसेना | २ |
| ६ | श्री.धनंजय बोडारे | शिवसेना | |
| ७ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | राष्ट्रवादी कॉंग्रेस | २ |
| ८ | श्रीमती संगिता कंडारे | राष्ट्रवादी कॉंग्रेस | |

माहे एप्रिल २०११ च्या सभेत निवृत्त होणा—या सदस्यांच्या जागी निवडावयाच्या नविन ८ सदस्यांच्या जागांच्या तुलनेत नियुक्तीचा पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनिधीत्व विवरण तक्ता खालीलप्रमाणे असेल.

| लोकभारती | शिवसेना | राकॉपा | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | २ | ० | १ | ० | ८ |

दरम्यान मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडुन दिनांक ११ मार्च २०११ चे पत्र क्र. साशाका—३/नपा—२/गटनोंदणी/२०११, दिनांक ५/३/२०११ अन्वये कळविण्यांत आले आहे की, लोकभारती पक्षाचे एकुण १४ नगरसेवकांनी लोकभारती पक्षास पाठिंबा दिला होता व गटनेता म्हणुन श्री. राजु (जीवन) इदनानी यांची निवड केली होती. यापैकी ६ नगरसेवकांनी स्वतंत्र आघाडी स्थापन केली आहे. तसेच श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, अपक्ष सदस्य व श्री. प्रशांत धांडे रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) यांनी स्वतंत्र आघाडी गटास व गटनेते श्री. सुरेश मधुकर जाधव यांना पाठींबा दिल्या अनुसार उपरोक्त गट नोंदणी मध्ये बदल करुन खालीलप्रमाणे गटनोंदणी केलेली आहे.

| अ.क्र. | नगरसेवकाचे नाव | निवडून आलेला प्रभाग | पक्ष | गटनेता | पाठिंबा दिलेला पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश मधुकर जाधव | ५३ | लोकभारती | श्री. सुरेश मधुकर जाधव | स्वतंत्र आघाडी |
| २ | श्री. विनोद लालसिंग ठाकुर | ६५ | | | |
| ३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४७ | | | |
| ४ | श्रीमती शिला सुभाष मनसुलकर | ५७ | | | |
| ५ | श्रीमती मोना अशोक वनवारी | ७२ | | | |
| ६ | श्री. भजनलाल रामचंदानी | ७४ | | | |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ७ | अपक्ष | श्रीम. निलम प्रेमसिंग रावत | स्वतंत्र आघाडी |
| ८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे | ५५ | रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया | श्री. प्रशांत किसनराव धांडे | |

शासनाकडुन दिनांक १० जानेवारी २००८ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले आहे की, '' कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणा—या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रन्टच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा''.

तौलनिक संख्याबळात बदल झाल्याने जर एकुण १६ सदस्यांच्या तुलनेत ठरविल्यास स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळानुसार पक्षनिहाय प्रमाणशीर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | शिवसेना | १७<br>—— X १६<br>७६ | ३.५७ =<br>३ + १ = ४ | (६) | कॉग्रेस | ६<br>—— X १६<br>७६ | १.२६ = १ |
| (२) | रा.का.पा. | १६<br>—— X १६<br>७६ | ३.३६ = ३ | (७) | आरपीआय | ५<br>—— X १६<br>७६ | १.०५ = १ |
| (३) | भाजपा | १२<br>—— X १६<br>७६ | २.५२ =<br>२ + १ = ३ | (८) | म.न.से. | २<br>——X १६<br>७६ | ०.४२ = ० |
| (४) | लोकभारती | ०९<br>—— X १६<br>७६ | १.८९ =<br>१ + १ = २ | (९) | अपक्ष | १<br>—— X १६<br>७६ | ०.२१ = ० |
| (५) | लोकभारती<br>स्वतंत्र आघाडी | ०८<br>—— X १६<br>७६ | १.६८ =<br>१ + १= २ | | | | |

| शिवसेना | राष्ट्रवादी कॉग्रेस | भाजपा | लोकभारती | लोकभारती स्वतंत्र आघाडी | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ०३ | ०३ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ० | १६ |

सबब, शासनाच्या मार्गदर्शनानुसार स्थायी समितीवर नेमलेल्या १६ सदस्यांच्या तुलनेत पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झाला असून पक्षाचे बलाबला अनुसार स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांच्या तुलनेत ठरविण्यास व रिक्त झालेल्या जागांवर खालील पक्षाच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. जेणेकरुन बलाबलाअनुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरततुदीची पूर्तता होवू शकेल.

| शिवसेना | राष्ट्रवादी कॉग्रेस | भाजपा | लोकभारती | लोकभारती स्वतंत्र आघाडी | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०१ | ०२ | ० | ०२ | ० | ०१ | ० | ०८ |

महापालिका ठराव क्र. ६७, दिनांक २०/३/२००९ च्या धोरणात्क निर्णयानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ (अ) मधील तरतुदी अनुसार माहे एप्रिल २०११ मध्ये महापालिकेद्वारे स्थायी समितीवर केली जाणारी ८ पालिका सदस्यांची नियुक्ती मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे ८ पदासाठीचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन करण्यांत येईल. त्यामुळे लोकभारती, कॉग्रेस व म.न.से या तिनही गटाचे प्रतिनिधींना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळणार नाही.

सबब निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा रिक्त होणा—या जागांवर फ्रन्टचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात विर्निदिष्ट केलेल्या संख्येप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदाच्या ८ रिक्त जागांवर नविन ८ सदस्य नेमणे प्रस्तावित.

म्हणुन योग्य त्या कायदेशिर निर्णयास्तव महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:** ७५ **दिनांक:—१७/३/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे लोकभारती गटनोंदणीमध्ये बदल झाल्याने त्या पक्षाचे पालिका सदस्य श्री. दिलीप जग्यासी व श्रीमती कविता सिरवानी यांचे नाव वगळता मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशास अधिन राहुन खालील आठ सदस्यांची स्थायी समितीवर नेमणूक करीत आहे.

१. श्री. चंद्रशेखर केशव यादव
२. श्रीमती ज्योती शाम माने
३. श्री. लाल देवनदास पंजाबी
४. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी
५. श्री. अॅड. अनिल (विद्यार्थी) आयलानी
६. श्रीमती शिला सुभाष मनसुलकर
७. श्री. प्रशांत किसनराव धांडे
८. श्री. बी.बी. मोरे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुसंख्येने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

प्रस्तावकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

विषय क्र. ८:– प्रस्तावाची सूचना

शहरात विना परवानगी बॅनर्स, झेंडे कटऑउटस लावणा-यांवर दंडात्मक कारवाई करणेकामी पालिका सदस्य, श्री. सुरेश जाधव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात ठिकठिकाणी विनापरवानगी, बॅनर्स, झेंडे कट आउट, लोखंडी सूचना फलक, तसेच रस्त्यांचे मधोमध व रस्त्यांचे कडेला लोखंडी पोल उभारुन विविध पक्षांचे झेंडे, बॅनर इत्यादी लावणेत येत आहेत. मंडप लावणेत येत आहेत. काही वेळेस थोर पुरुषांच्या पुतळया समोरही बॅनर्स, झेंडे इत्यादी लावून गर्दी करण्यात येत आहे. वरील सर्व प्रकारामुळे थोर पुरुषांच्या पुतळयाचा अवमान होत आहे. विनापरवानगी लावण्यात येत असलेल्या बॅनर, कट आउट, पोस्टरमुळे काही वेळेस शहरात तणावाचे प्रसंग घडलेले आहेत. असे प्रकार भविष्यात होवू नयेत म्हणुन बॅनर्स, झेंडे, कट आउट, मंडप ताब्यात घेतल्यास, किंवा विना परवानगी लावण्यावर दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई केल्यास व अशा कारवाईस कुचराई करणा–या संबंधीत अधिका–यावर शिस्त भंगाची कारवाई केल्यास अशा प्रकारांना आळा बसून शहराचे सौंदर्य अबाधित ठेवता येईल तसेच महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होईल या करीता सदरील अशासकिय प्रस्तावावर महासभेत चर्चा होवून आवश्यकत कारवाई होणे करीता सादर.

**महासभा ठराव क्र:** ७६ **दिनांक:–१७/३/२०११**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे वेळोवेळी शहरात विना परवानगी लावण्यात येत असलेल्या झेंडे, बॅर्नर, कट आउट, पोस्टर कायदयाच्या पुर्ततेस अधिन राहून हटविण्यास व खटला भरण्याप्रयोजनार्थ महापालिकेच्या संबंधित अधिका–यांना आदेशित करीत आहे. व आयुक्तास कसूरदार अधिका–याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

विषय क्र. ९:— प्रस्तावाची सूचना

महापालिका सेवेतून श्री. दिपक मोरे, श्री. सागर घोलप व श्री. नानासाहेब कामठे यांना सहाय्यक आयुक्त पदातून कार्यमुक्त करणे व रिक्त होणा-या पदांवर महापालिका सेवेतील पात्र अधिका-यांना पदोन्नती देणे बाबत श्री. बी.बी. मोरे व इतर पालिका सदस्यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर हे १३ चौ.कि.मी. क्षेत्राचे छोटेसे शहर आहे. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शासनाकडुन सहाय्यक आयुक्त पदी प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणे गरजेचे आहे. आता उल्हासनगर महापालिका सेवेत पाच सहाय्यक आयुक्त शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे......

१) श्री. दिपक मोरे
२) श्री. सागर घोलप
३) श्री. नानासाहेब कामठे
४) श्री. समीर भुमकर
५) श्री. विनोद डवले

हे पाच सहा. आयुक्त कार्यरत असतांनाही अनाधिकृत बांधकामे, होर्डिंग्ज हटविणे, सार्वजनिक साफसफाई व मिळकत करांची वसुली इत्यादीमध्ये अपेक्षित परिणाम दिसुन येत नाही.

उल्हासनगर महापालिकेने दिनांक २०/१०/२०१० रोजीच्या महासभा ठराव क्र. ४१, अनुषंगाने शासन निर्णय क्र. संकिर्ण १००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५, दिनांक नवि.२४ व दिनांक ४ मे २००६ प्रमाणे सहा. आयुक्तांचे ४ पदनिर्मितीस मान्यता दिली आहे व महापालिका सेवा भरती नियमानुसार सहा. आयुक्त पदावर २ पदे नामनिर्देशनाने व २ पदावर पदोन्नतीने नियुक्ती केली पाहिजे.

सध्या ३ सहा. आयुक्त अतिरिक्त असल्याने महापालिका सेवेत उपलब्ध असलेल्या अधिका—यांना सहा. आयुक्त पदी पदोन्नती देणे शक्य नाही. त्यामुळे १. श्री. दिपक मोरे, २. श्री. सागर घोलप, ३. श्री. नानासाहेब कामठे सदर ३ पदे रिक्त करणे गरजेचे असून त्यांना महापालिका सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करण्यास महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: **XXX**

दिनांक:—१७/३/२०११

सुचकाचे नाव :—

अनुमोदकाचे नाव :—

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता महापालिका सेवेतून श्री. दिपक मोरे, श्री. सागर घोलप व श्री. नानासाहेब कामठे यांना सहाय्यक आयुक्त पदातून कार्यमुक्त करीत आहे. व रिक्त होणा—या पदांवर महापालिका सेवेतील पात्र अधिका—यांना पदोन्नती देणेकामी प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

प्रस्तावकाचे नाव :— श्रीमती जयश्री सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**विषय क्र. १० :—** प्रस्तावाची सूचना

पाले ते गायकवाडपाडा दरम्यान मुख्य जलवाहिनी खाजगी जमीनीतून टाकतांना बांधीत झालेल्या जमीनधारकांचे वारसांना मजूर/वॉलमन पदी महापालिका सेवेत कायम स्वरुपी सामावून घेणे बाबत पालिका सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे सुनिल सुर्वे याचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील कॅम्प ४ व ५ मधील पाणी टंचाई दूर करुन सुरळीत पाणी पुरवठा करणेसाठी पाले ते गायकवाडपाडा दरम्यान खाजगी जमिनितून मृद लोखंडी जलवाहिनीचे काम करणेत आले असून बाधित जमिनधारकांचे मागणीनुसार श्री. राजेश ब्रम्हण तरे, अशोक वायले, ज्ञानेश्वर वायले, चंद्रकांतवायले यांना महापालिका सेवेत अस्थायी पदावर महासभा ठराव क्र. २५, दिनांक २०/११/२००६ अन्वये नियुक्ती देणेत आली आहे. सन २००६ ते २३/२/२०११ पर्यंतच्या सेवा कालात संबंधितांना महापालिका प्रशासनाने सहा सहा महिन्यांचे आदेश देवून वर्ग ४ मधील मजूर/वॉलमन या पदावर मागील पाच वर्षापासून सेवेत ठेवले आहे. सदर प्रकरणांतील अन्य जमिनधारकांचे वारस श्री. सुभाष फुलोरे, सुभाष वायले, जितेंद्र मढवी व विशाला वायले यांना प्रशासनाने यापुर्वीच महापालिका सेवेत कायम स्वरुपी आदेश दिलेले असून श्री. तरे व वायले या कर्मचा—यांचे कायम स्वरुपाचे आदेश मात्र रखडवून ठेवून त्यांचेवर अन्याय करण्यात येत आहे.

संबंधीत बाधीत जमिनधारकांचे वारसांनी यांनी सन २००६ पासून आजतागायत आयुष्याचे महत्वाचे उमेदीचे काळात नियममितपणे, प्रामाणिकपणे, व्यवस्थितपणे, इमानेइतबारे, रात्री अपरात्री काम करुन महापालिका व महापालिका क्षेत्रातील नागरीकांची सेवा केलेली असल्याने त्यांचे अन्य सहका—याप्रमाणे संबंधीतांना समान न्याय देवून महापालिका सेवेत कायम स्वरुप सामावून घेणेसाठी, त्यांना न्याय मिळवून देणेसाठी सदर अशाासकिय प्रस्तावास मान्यता देवून सदर प्रकरणी महासभेत चर्चा होवून कायम स्वरुपी आदेश काढणेत यावेत ही नम्र विनंती.

**महासभा ठराव क्र:** ७७ **दिनांक:—१७/३/२०११**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता पाले ते गायकवाडपाडा दरम्यान मुख्य जलवाहिनी खाजगी जमीनीतून टाकतांना बांधीत झालेल्या जमीनधारकांचे वारसांना मजूर/वॉलमन पदी महापालिका सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याप्रयोजनार्थ शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ११** :—उल्हासनगर महापालिका क्षेत्रात विदयुत विभागामार्फत पथदिव्यांमध्ये उर्जा बचतीसाठी
सयंत्रे अस्थापित करणे व महाऊर्जा व शासन योजनेअंतर्गत २५ लाखापर्यंत अर्थसहाय्याचा लाभ घेण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

राज्यात पाणीपुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये सुमारे ३० टक्के ऊर्जा बचतीस वाव आहे. महानगरपालिका क्षेत्रांमध्ये हाताने पथदिवे सुरू व बंद करण्यात येत असलेली प्रथा बंद करून त्याऐवजी पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचत करणारे सयंत्र/यंत्रणा उदा. ॲटो सेन्सर, व्होल्टेज डिमिंग तंत्र, टायमर, स्काडा, वेब बस्ड मॉनिटरींग सिस्टीम इत्यादी ऊर्जा बचत उपकरणे आस्थापित करण्यासाठी उपरोक्त संदर्भित क्र.२ दिनांक १३ जाने. २०११ च्या शासन निर्णयानुसार शासनाकडुन रू. २५ लाखापर्यंत अर्थसहाय्य मंजुर करण्यात येणार आहे.

उल्हासनगर शहरात होणारा पाणीपुरवठा हा एमआयडीसीमार्फत होत आहे त्यामुळे पथदिव्यांसाठी सदर योजनेचा लाभ घेता येईल. महानगरपालिकेमार्फत पथदिव्यांमधील ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे आस्थापित करण्यासाठी अर्थसहाय्याच्या योजनेसाठीच्या मार्गदर्शक सुचना खालिलप्रमाणे देण्यात आल्या आहेत.

१. महानगरपालिका यांच्याकडील पथदिव्यांमध्ये वीज बचतीसाठी ॲटो सेन्सर, व्होल्टेज डिमिंग तंत्र, टायमर, स्काडा, वेब बस्ड मॉनिटरींग सिस्टीम अशा यंत्रणा उभारण्यासाठी महाऊर्जातर्फे जास्तीत जास्त रू. २० लाख एवढे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रकल्प मोठया प्रमाणात राबविण्यासाठी महानगरपालिका यांनी देखील त्यामध्ये जास्तीत जास्त आर्थिक तरतूद लाभार्थी हिस्सा म्हणुन करावी.

२. प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. त्यासाठी महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थाकडुन सल्ला घेण्यात यावा.

३. सदर प्रकल्प राबविण्यासाठी महानगरपालिका यांनी त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी. महानगरपालिका यांनी महाऊर्जाकडे प्रस्ताव पाठवितांना वरीलप्रमाणे त्यांच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी व सक्षम प्राधिका—याचे या सूचनांसांबत विहीत प्रमाणपत्र जोडावे.

४. सदर योजनेत महानगरपालिका यांची निवड करताना ज्या महानगरपालिका यांनी त्यांच्या हिश्श्याची तरतुद केली आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

५. महानगरपालिकांनी त्यांचे प्रस्ताव हिश्श्यांची तरतुद करून प्रमाणपत्रासह महाऊर्जास परस्पर पाठवावेत.

६. प्रस्तावासोबत प्रकल्प अहवाल, आवश्यकतेनुसार माहिती तसेच हमीपत्र जोडण्यात यावे.

७. महाऊर्जातर्फे आवश्यक ती छाननी करण्यात येऊन प्रकल्पास तत्वत: मंजुरी देण्यात येईल. शासनातर्फे निधी प्राप्त झाल्यावर संबंधित घटकांस सुपूर्द करण्यात येईल.

उल्हासनगर शहरातील पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी वित्तीय वर्ष २०११—२०१२ मधील महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये **‘ शोध विकास व अपारंपारिक वीज व ऊर्जा संवर्धन इत्यादी’** या बजेट हेडमध्ये रू.२० लाखाची तरतुदही केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागामार्फत पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे आस्थापित करून महाऊर्जा व शासनाकडुन बनविलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी धोरणात्मक निर्णयासाठी महासभेपुढे मंजुरीकरीता सादर.

महासभा ठराव क्र: ७८ — दिनांक:—१७/३/२०११

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महापालिका क्षेत्रात विदयुत विभागामार्फत पथदिव्यांमध्ये उर्जा बचतीसाठी सयंत्रे अस्थापित करणे व महाऊर्जा व शासन योजनेअंतर्गत २५ लाखापर्यंत अर्थसहाय्याचा लाभ घेण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** १२:— उल्हासनगर महानगरपालिकेने सपना गार्डन उल्हासनगर—३ येथे श्रीमती कमला केवलराम ठाकुर या नावाने बांधलेले वाचनालय देखभाल दुरुस्ती व वापर प्रयोजनार्थ बिनाभाडे योग्य संस्थेशी जागा वापर परवाना करार करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेने सपना गार्डन उल्हासनगर—३ येथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन वाचनालयासाठी १२.०० X २१.०० मीटर बांधकाम करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी वाचनालयासाठी दोन संस्थानी वाचनालय चालविण्यासाठी व देखभाल दुरूस्तीसाठी मिळणेस विनंती केलेली आहे.

सिंधी काउंसिल ऑफ इंडिया या संस्थेने नोंदनीकृत प्रमाणपत्र व तीन वर्षाचे लेखे सादर केलेले आहेत. त्यांनी सदर ठिकाणी वाचनालयासोबत त्या ठिकाणी सर्व समाज बांधवासाठी अनेक लोकपयोगी कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रामुख्याने महिलांसाठी कुकिंग क्लासेस, शिलाई क्लासेस, मेहंदी क्लासेस तसेच लहान मुलांसाठी विविध भाषेचे ज्ञान इत्यादी प्राप्त करून देणार आहेत.

सिंधुनगर सिनिअर सिटीझन्स फेडरेशन या संस्थेने ११ वर्षाच्या कालावधीसाठी सदरचे वाचनालय मोफत चालविण्यासाठी मागणी केलेली आहे. सदर संस्थेने **सिंधु सिनिअर सिटीझन्स क्लब** या संस्थेच्या नावाने मिळणेस विनंती केलेली आहे, तसेच त्यांनी या संस्थेचे नोंदणीकृत प्रमाणपत्र व तीन वर्षाचे लेखे सादर केलेले आहेत.

अर्जदारानी मागणी केल्याप्रमाणे "श्रीमती कमला केवलराम ठाकुर" या नावाने महापालिकेने बांधलेले वाचनालय सद्यस्थितीत बंद अवस्थेत आहे ते देखभाल करण्यासाठी दिल्यास सदर मालमत्ता वाचनालयासाठी उपयोगात येणार आहे व त्याचा फायदा नागरीकांना मिळेल या सर्व बाबी लक्षात घेता दोन्ही संस्थांनी मागणी केल्यानुसार सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे धारेणात्मक निर्णय व अटी शर्ती निश्चित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ७९ — दिनांक:—१७/३/२०११

सुचकाचे नाव :— श्री.कुमार आयलानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिकेने सपना गार्डन उल्हासनगर—३ येथे श्रीमती कमला केवलराम ठाकुर या नावाने बांधलेले वाचनालय देखभाल दुरुस्ती व वापर प्रयोजनार्थ सिंधुनगर सिनिअर सिटीझन्स फेडरेशन या संस्थेस ०५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति माह नाममात्र रु. १/— भाडयाने जागा वापर परवाना करार करणे मान्य करीत आहे.

परंतु——

जेव्हा ही जागा किंवा इमारत पे ॲण्ड पार्क या तत्वावर विकसित करण्यास आवश्यक असेल तेव्हा ही जागा परत घेण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. धनंजय बोडारे

महासभा ठराव क्र. :— १ अ                                    दिनांक : २०/४/२०११

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

विषय क्र. १:—''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नागरिकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नवीन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे''या योजनेस मुदत वाढ देणेबाबत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

**स्थगित प्रस्ताव**

मंगळवार दिनांक १९/४/२०११ रोजी उल्हासनगरमध्ये कॅम्प नं. २ मधील शिश महल ही इमारत कोसळुन फार मोठी दु:खद घटना घडली आहे. त्यामध्ये जवळ जवळ ८ लोकांचा मृत्यु झाला आहे. या दुर्घटनेमध्ये मृत्यु पावलेल्यांना श्रध्दांजली अर्पित करुन या सभेचे कामकाज सोमवार दिनांक २५/४/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १ ब** — **दिनांक : २०/४/२०११**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/४/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभचे कामकाज सोमवार दिनांक २५/४/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २** :— मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १७/३/२०११ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

महासभा ठराव क्र. १ ड    दिनांक : —४/५/२०११

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १७/३/२०११ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर शहरातील धोकादायक अनाधिकृत इमारती नियमाधिन पात्र नसून किंवा नियमाधिन झाल्यानंतर पुर्नबांधणीसाठी ४.०० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल या तरतुदी प्रयोजनार्थ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमातील अधिनियम २००६ मध्ये सुधारणा शिफारस करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातध्ये अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणामध्ये होऊन सन १९९१ ते १९९६ या कालावधीमध्ये रेतीचा तुटवडा असल्यामुळे माती मिश्रीत वाळू वापरुन तसेच स्वस्त दरामध्ये इमारतींचे साहित्य उपलब्ध झाल्याने अनेक इमारती बांधण्यात आल्या. परंतू अशा इमारतींचे आयुष्य कमी असल्यामुळे त्या इमारती धोकादायक होऊन कोसळण्याच्या मार्गावर आहेत. तथापि उल्हासनगर शहराच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये अशा धोकादायक इमारतींचे पुर्नबांधणी करताना चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन देण्याची तरतुद नसल्यामुळे अशा इमारतींना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येत नाही.

उल्हासनगर शहरातील इमारतींपैकी एक इमारत तळमजला + ४ मजलेची वाणिज्य व रहिवासी वापरासाठी बांधण्यात आलेली होती व त्यात तळमजल्यावर ३ दुकाने व १ ते ४ मजल्यावर १८ सदनिका होत्या. ती इमारत पूर्णपणे कोसळली. तद्नंतर सदर इमारतीचे दुप्पट चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम नकाशे मंजूरीस सादर केले होते. तथापि, अशा प्रकारचे प्रावधान मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाही. तथापि, सध्या सदर जागेवर १ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे. चटई क्षेत्र निर्देशांक १ प्रमाणे पूर्वी रहात असलेले १८ सदनिकाधारक आणि ३ दुकानदार यांना ही जागा अपूरी पडत असल्यामुळे त्यांच्याकडून आणि महानगरपालिकेच्या अशा धोकादायक इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची मागणी होत आहे. तसेच अनधिकृत विकासकामे यांना देय केलेल्या ४ चटई क्षेत्राप्रमाणे धोकादायक अनधिकृत विकास कामे यांना अनुज्ञेय न केल्यामुळे धोकादायक अनधिकृत विकास कामात राहणाऱ्या लोकांवर अन्याय होत आहे.

उपरोक्त बाबींचा यापूर्वी संदर्भ क्र. १ ते ३ अन्वये कार्यवाही करणेत आलेली आहे. परंतू सदरहू कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेसाठी केली आहे. प्रस्तुत सदरचे फेरबदल सन २००६ च्या अधिनियमामध्ये करावयाचे असल्याने त्यासंदर्भात उल्हासनगर महानगरपालिकेचा ठराव पारित करणेसाठी मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. ०९.०३.११ रोजी झालेल्या बैठकीत आदेशित केलेले आहे.

तरी वरील वस्तुस्थिती लक्षात घेता उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरीता सन २००६ च्या अधिनियमानुसार अनधिकृत विकासकामे यांना ४ चटई क्षेत्र निर्देशांकाच्या धर्तीवर उल्हासनगर शहरातील धोकादायक अनधिकृत इमारतींच्या पुर्नबांधणीसाठी ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होण्याच्या दृष्टिने सन २००६ च्या अधिनियमामध्ये कलम ४(२) (ब) नंतर खालीलप्रमाणे दुसरे परंतू का अन्वये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

‘‘परंतू आणखी असे की, जर अनधिकृत विकास काम हा धोकादायक व मोडकळीच्या स्थितीत असल्यास त्यास उपरोक्त पूर्तता करणे आवश्यक राहणार नाही.’’

सदर विषय महासभेत चर्चा व विचारविनिमयाकरीता विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

**महासभा ठराव क्र: २** **दिनांक : —४/५/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर शहरातील धोकादायक अनाधिकृत इमारती नियमाधिन पात्र नसून किंवा नियमाधिन झाल्यानंतर पुर्नबांधणीसाठी ४.०० चटईक्षेत्र निर्देशांक पर्यंत अनुज्ञेय असेल या तरतुदी प्रयोजनार्थ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे अधिनियम २००६ मध्ये सुधारणा करणेस शासनास शिफारिश करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत २ सफाई कामगार यांच्या वारसास नियुक्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | सेवानिवृत्तीचा | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विरेंद्र बलवीर | २८/६/२००९ | श्रीम. मिना विरेंद्र | पत्नी |
| २ | श्री. रामु रखमाजी खुडे | १९/१०/२०१० | श्री. विशाल रामु खुडे | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३ दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

अनुमोदकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. विरेंद्र बलवीर व श्री. रामु रखमाजी खुडे या दोन सेवा निवृत्त सफाई कामगारांचे नावासमोर दर्शविलेल्या त्यांच्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी<br>सर्वसाधारण महासभा<br>उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** श्रीमती दिलीपो महेंद्र, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. दिलिपो महेंन्द्र | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/३/२०११ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ४      दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती निलु चांदवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती दिलीपो महेंद्र, सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६:—** श्रीमती सरस्वती गामा गायकवाड, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सरस्वती गामा गायकवाड | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०११ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५ — दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती शकुंतला पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती सरस्वती गामा गायकवाड, सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ७:—** २ सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सुमन लक्ष्मण लोट | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०११ |
| २ | श्रीम. लक्ष्मी कालु | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०३/२०११ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६ दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्रीमती मंजु पोपटानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे २ सफाई कामगार श्रीमती सुमन लक्ष्मण लोट व श्रीमती लक्ष्मी कालु यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# `उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ८:–** श्री. शिवाजी गोपाळ जाधव, लिपिक आरोग्य विभाग यांना वैद्यकीय खर्चापोटी रु. २,६९,६७९/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

प्रस्तावना

श्री. शिवाजी गोपाळ जाधव, लिपीक आरोग्य विभाग यांना उपमार्ग साचक हदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) व हदयावरील शस्त्रक्रिया धन्वतरी हॉस्पीटल, बदलापुर व आयकॉन हॉस्पीटल डोंबिवली येथे दिनांक २०/०८/२०१० ते २४/०८/२०१० व दि. २४/०८/२०१० ते १५/०९/२०१० पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये २,६९,६७९/– (दोन लाख एकोनसत्तर हजार सहाशे एकोनऐंशी) इतका खर्च झाला असुन त्यांनी सर्व वैद्यकीय बिले जोडली आहे. तरी त्यांनी अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

मा. महासभा ठराव क्र. ९० दि. १०/०९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा–यांना व त्यांच्या कुटुंबीयांना तातडीच्या आजारावर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपुर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ लागू करणेस शिवाय (१) उपमार्ग साचक हदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) (२) मुत्रपिंड रोपन (३) रक्ताचा कर्क रोग (४) हदयावरील शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय रुग्णाच्याकडुन अंकित करण्यात येणा–या अंदाजीत खर्चास १००% देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्ताना प्राधिकृत केले आहे.

सबब श्री. शिवाजी गोपाळ जाधव, लिपीक आरोग्य विभाग यांनी त्यांच्या उपमार्ग साचक हदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) व हदयावरील शस्त्रक्रिया आयकॉन हॉस्पीटल डोंबिवली येथे करण्यात आली आहे. तरी श्री. शिवाजी गोपाळ जाधव, लिपीक आरोग्य विभाग यांना एक विशेष बाब म्हणून रु. २,६९,६७९/– (दोन लाख एकोनसत्तर हजार सहाशे एकोनऐंशी) फक्त एवढी रक्कम मंजुर करणेसाठी मा. महासभेपुढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७ दिनांक : –४/५/२०११

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतिश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. शिवाजी गोपाळ जाधव, लिपिक आरोग्य विभाग यांना एक विशेष बाब म्हणुन वैद्यकीय खर्चापोटी अनुज्ञेय रक्कमपेक्षा जास्त रु. २,६९,६७९/- प्रतिपुर्ती मान्य करीत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ९:–** श्री. अनंता चिंतामण भोपी, विद्युत मदतनीस यांना कामगार न्यायालयाचा आदेश विचारात घेवुन दिनांक २७ जुन २००८ पासुन सेवेत पुर्नस्थापित करुन पुढील नियमित वेतनवाढी अदा करणेस व त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांका (२५/९/२००३) पासुनची सलग सेवा सेवानिवृत्ती प्रयोजनार्थ ग्राह्य धरणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. अनंता चिंतामण भोपी यांची विदयुत मदतनीस या मंजुर व रिक्त पदावर दोन वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी का.आ.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२२२, दिनांक २५/९/२००३ अन्वये नियुक्ती करणेत आली होती. त्यानुसार ते विदयुत विभागात दिनांक २५/९/२००३ पासुन रुजु झाले. त्यानंतर श्री. अनंता भोपी यांचे बाबत दिनांक २२/१०/२००३ रोजी पत्राद्वारे महापालिकेतर्फे वर्तणूक व पुर्वचारीत्रय पडताळणी अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार मा. पोलिस अधिक्षक, ठाणे, ग्रामीण ठाणे यांचे कार्यालयाकडुन दिनांक २७/६/२००५ च्या पत्राद्वारे मुरबाड पोलिस स्थानक येथे श्री. अनंता भोपी यांचेविरुध्द भा.द.वि.सं.गु.र.नं.२१/९९ दिनांक ६/२/१९९९ रोजी गुन्हा दाखल असुन कोर्ट केस नं. १५/९९ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणुन सीआरपी १०७ प्रमाणे दिनांक १५/२/१९९९ रोजी चॅप्टर केस करण्यात आल्याचे दिनांक २७/४/२००५ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविण्यांत आले होते.

त्या अनुषंगाने महापालिकेने दिनांक १३/६/२००५ च्या आदेशान्वये सदर कर्मचारी यांची सेवा संपृष्ठात आणून मा. महासभा ठराव क्र. ३५, दिनांक २०/७/२००५ अन्वये सदर आदेशास कार्योत्तर मंजुरी घेतली होती.

श्री. भोपी यांनी प्रस्तृत प्रकरणी मा. कामगार न्यायालय, ठाणे येथे याचिका दाखल केली असता याचिका क्र. युएलपी ८६/२००५ आणि औद्योगिक न्यायालय, ठाणे यांचेकडील याचिका क्र. युएलपी ११४/०६ नुसार त्यांच्या चॅप्टर केसच्या विरोधात न्यायालयाने त्याची निर्दोष सुटका केली आहे. म्हणुन मा. महासभा ठराव क्र. १३, दिनांक १२/६/२००८ नुसार कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१८३/०८, दिनांक २७ जुन २००८ अन्वये श्री. अनंता भोपी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परिकय सेवा व निलंबन, बडतर्फ काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७० व ७१ नुसार महापालिका सेवेत पुर्नस्थापित करणेत आले आहे.

श्री. अनंता चिंतामण भोपी, विदयुत मदतनीस, कार्यरत विदयुत विभाग यांनी आपल्या दिनांक ११/११/२०१० च्या अर्जान्वये महापालिका सेवेत पुर्नस्थापित केल्यानुसार त्यांची सेवा प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन सलग गणण्यात येवुन त्यानुसार नियमित वेतनवाढ अदा करणेबाबत तसेच निलंबन कालावधी सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राहय धरणेबाबत विनंती अर्ज केला होता. या संदर्भात महापालिकेचे पॅनल विधीतज्ञ श्री. भोळे यांचेकडुन अभिप्राय मागविला असता त्यांनी श्री. भोपी यांना सेवेतुन बडतर्फ केलेला कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजनार्थ ग्रहय धरणेबाबत अभिप्राय दिलेला आहे. त्यानुसार श्री. भोपी यांची सलग सेवा प्रथम नियुक्तीचा दिनांक २५/९/२००३ पासुन सेवानिवृत्तीच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरण्यात यावा व त्यांना महापालिका सेवेत पुर्नस्थापित केल्यचा दिनांक २७ जुन २००८ पासुन पुढील नियमित वेतनवाढी अदा करणेबाबत व त्यांचबरोबर सेवापुस्तक तयार करुन त्यामध्ये वरीलप्रमाणे नोंद घेण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ८</u>      <u>दिनांक : –४/५/२०११</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. अनंता चिंतामण भोपी, विद्युत मदतनीस यांना कामगार न्यायालयाचा आदेश विचारात घेवुन दिनांक २७ जुन २००८ पासुन सेवेत पुर्नस्थापित करुन पुढील नियमित वेतनवाढी अदा करणेस व त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांका (२५/९/२००३) पासुनची सलग सेवा सेवानिवृत्ती प्रयोजनार्थ ग्राहय धरणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १०:—** मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. २६ (सपना गार्डन) बगीचा त्याचे क्षेत्र १.२५ एकर (०.५०) हेक्टर तसेच प्रारुप विकास योजने नुसार बगीचा वगळुन ते नविन आरक्षण क्र. २६ अ वाहनतळ प्रयोजनार्थ बदल करण्यास अंतिम स्विकृती देणे व शासनाकडे मंजुरीस पाठविणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयी संदर्भित पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, उल्हासनगर शहराची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस—१२०१/६०१८५/सीआरपी दि. २७.०५.१९७४ अन्वये मंजूर केलेली असुन ती दि. ०१.०७.१९७४ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेली उल्हासनर शहराची सुधारीत प्रारुप विकास योजना कलम—२६ अन्वये सन २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि, शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस—१२०२/ ०६/सीआर—२००२/युडी—१२ दि. २६.१०.०४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र यामधुन वगळले असुन उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करुन सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे त्यामध्ये सदर सुधारीत विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत मुळ मंजूर विकास योजना व प्रारुप विकास योजना लागू राहतील असे नमुद केले आहे.

मा. महापौर यांचे दि. ०५.१०.१० रोजीच्या पत्रानुसार उल्हासनगर कॅम्प नं. १,२,३, येथे 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्वावर सर्वांचे सोयीचे होईल अशा ठिकाणी वाहन तळाची जागा सूचित करणेबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २६ (सपना गार्डन) बगीचा त्याचे क्षेत्र १.२५ एकर (०.५० हेक्टर) तसेच प्रारुप विकास योजनेनुसार खेळाचे मैदान दाखविण्यात आलेले आहे. त्या आरक्षणाचे बदल करुन ते रहिवास व वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्याचे व उर्वरित क्षेत्रामध्ये 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा' या तत्वावर वाहनतळ बांधणेबाबत प्रस्ताव विशेष महासभा ठराव क्र. ४३ दि. २०.१०.१० अन्वये पारीत केलेले आहे.

मंजूर व प्रारुप विकास आराखडयातील आरक्षणाखालील जागा वगळुन ती वाणिज्य विभागात समाविष्ट करण्याचे ठरविले आहे त्या प्रयोजनार्थ मंजूर विकास आरक्षणाच्या आराखडयामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये बदल करणेपूर्वी प्रकरणी महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले फेरबदल दर्शविणारे भाग नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले असल्याची नोटीस स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि. १७.१२.१० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती व त्याची मुदत दि. १८.०१.११ रोजी संपुष्टात आली व दि. ०१.०२.११ रोजी नोटीस शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

विहीत मुदतीत नगररचना विभागात कोणतीही हरकत वा सूचना प्राप्त झालेली नसल्याने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ च्या तरतुदीनुसार शासनास पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविणेपूर्वी महासभेची मंजूरी प्राप्त करणेकरीता सदर विषयाचा गोषवारा महासभेच्या विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

महासभा ठराव क्र: ९ — दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. २६ (सपना गार्डन) बगीचा त्याचे क्षेत्र १.२५ एकर (०.५०) हेक्टर तसेच प्रारुप विकास योजने नुसार बगीचा वगळुन ते नविन आरक्षण क्र. २६ अ वाहनतळ प्रयोजनार्थ बदल करण्यास अंतिम स्विकृती व शासनाकडे मंजुरीस पाठविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ११:–** मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. २९ बगीचा तसेच प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ९० मनोरंजनासाठी खुली जागा त्याचे क्षेत्र १.२५ हेक्टर पैकी ७३५५.१२ चौ.मी. क्षेत्र रहिवास व वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्याबाबत व उर्वरीत क्षेत्रामधील आरक्षणाचे नामानिधान बगीचा ऐवजी अद्यावत रुग्णालय करण्याप्रयोजनार्थ बदल करण्यासाठी अंतिम स्विकृती देणे व शासनाकडे मंजुरीस पाठविणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयी संदर्भित पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, उल्हासनगर शहराची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस–१२०१/६०१८५/सीआरपी दि. २७.०५.१९७४ अन्वये मंजूर केलेली असुन ती दि. ०१.०७.१९७४ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेली उल्हासनर शहराची सुधारीत प्रारुप विकास योजना कलम–२६ अन्वये सन २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि, शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस–१२०२/ ०६/सीआर–२००२/युडी–१२ दि. २६.१०.०४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव–बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र यामधुन वगळले असुन उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करुन सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे त्यामध्ये सदर सुधारीत विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत मुळ मंजूर विकास योजना व प्रारुप विकास योजना लागू राहतील असे नमुद केले आहे.

मा. महापौर यांचे दि. २६.०८.१० रोजीच्या पत्रानुसार उल्हासनगर कॅम्प नं. ३ येथे सर्वांचे सोयीचे होईल अशा ठिकाणी शांतीनगर महानगरपालिकेचे अद्यावत रुग्णालयासाठी जागा सूचित करणेबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २९ बगीचासाठी आरक्षित क्षेत्र ३.५९ एकर (१.४५ हेक्टर) तसेच प्रारुप विकास आरक्षण क्र. ९० मनोरंजनासाठी खुली जागा त्याचे क्षेत्र १.२५ हेक्टर . आरक्षणाचे बदल करुन ते रहिवास व वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्याचे व उर्वरित क्षेत्रामध्ये नामानिधान वापराऐवजी अद्यावत महानगरपालिकेचे रुग्णालयाचा प्रस्ताव विशेष महासभा ठराव क्र. ४४ दि. २०.१०.१० अन्वये पारीत केलेले आहे.

मंजूर व प्रारुप विकास आराखडयातील आरक्षणाखालील जागा वगळुन ती वाणिज्य विभागात समाविष्ट करण्याचे ठरविले आहे त्या प्रयोजनार्थ मंजूर विकास आरक्षणाच्या आराखडयामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये बदल करणेपूर्वी प्रकरणी महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले फेरबदल दर्शविणारे भाग नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले असल्याची नोटीस स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि. १७.१२.१० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती व त्याची मुदत दि. १८.०१.११ रोजी संपुष्टात आली व दि. ०१.०२.११ रोजी नोटीस शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

विहीत मुदतीत नगररचना विभागात कोणतीही हरकत वा सूचना प्राप्त झालेली नसल्याने एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ च्या तरतुदीनुसार शासनास पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविणेपूर्वी महासभेची मंजूरी प्राप्त करणेकरीता सदर विषयाचा गोषवारा महासभेच्या विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

**महासभा ठराव क्रः १०** **दिनांक : –४/५/२०११**

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. २९ बगीचा तसेच प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ९० मनोरंजनासाठी खुली जागा त्याचे क्षेत्र १.२५ हेक्टर पैकी ७३५५.१२ चौ.मी. क्षेत्र रहिवास व वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्याबाबत व उर्वरीत क्षेत्रामधील आरक्षणाचे नामानिधान बगीचा ऐवजी अद्यावत रुग्णालय करण्याप्रयोजनार्थ बदल करण्यासाठी अंतिम स्विकृती व शासनाकडे मंजुरीस पाठविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

आयत्यावेळचा विषय

विषय क्र. १२:— ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नागरिकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नवीन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे'' या योजनेस मुदत वाढ देणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत'' पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टाकणे व नवीन उंच जलकुंभ बांधण्याचे काम सध्या सुरु असून वितरण वाहिनीचे काम विरण वाहिनीच्या चाचणीसह पुर्ण होईल. त्या भागातील अस्तित्वातील वैध नळजोडण्या जुन्या वितरण वाहिनी वरुन काढून नवीन जलवाहिनीवर जलमापकासह विनामुल्य जोडून देणे. तसेच नवीन जलवाहिनीवर जोडणी साहित्य व जलमापकासह नविन नळजोडणी सवलतीच्या दरात देणे. यासाठी मा. महासभेने ठराव क्र. ६१, दिनांक २८/१२/२०१० अन्वये ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत'' नविन नळजोडणी मंजूरीकरिता विशेष माहिमेस मंजूरी दिली आहे. या मोहिमे अंतर्गत

१) ग्राहकांना त्यांची नळ जोडणी जुन्या जलवाहिनीवरुन नवीन जलवाहिनीवर जलमापकासह विनामूल्य बदलून देण्यात येईल.

२) ग्राहकांना जुने नांव बदलून नळजोडणी वर नविन नांव लावावयाचे असल्यास नांवात बदल विनामुल्य करुन देण्यात येईल.?

३) अस्तित्वातील नळजोडणी कायमस्वरुपी खंडीत करावयाची असल्यास ती विनामुल्य करुन देण्यात येईल.

४) नवीन जलवाहिनीवर जोडणी साहित्य व जलमापकासह नवीन नळजोडणी सवलतीच्या दरात देण्यात येईल.

ही कामे करण्यात येतील, यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह पूर्णपणे भरुन दिनांक ३१/०३/२०११ अशी ठेवण्यात आली आहे. परंतु फेब्रुवारी २०११ मध्ये बरेचसे कर्मचारी जनगणनेच्या कामामध्ये व्यस्त होते. तसेच पूर्णपणे भरलेले अर्ज नागरिकांकडून प्राप्त होण्यास अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे.

शहरातील सर्व प्रभागांमध्ये हे अर्ज वितरीत करणे व पूर्णपणे भरलेले अर्ज नागरिकांकडून आवश्यक आहे. तरी सदर योजनेची मुदत वाढवून जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेमधील वितरण व्यवस्थेची सर्व कामे पूर्ण होईपर्यंत अशी करण्याचा प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर करीत आहे.

महासभा ठराव क्र: — ११ दिनांक : —४/५/२०११

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

ही महासभा दिनांक २८/१२/२०१० रोजीच्या महासभा ठराव क्र ६१ मध्ये अशंता बदल करुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत नागरिकांच्या अस्तित्वातील नळजोडण्या नव्या पाईप लाईनवर विनामुल्य जोडणे व नवीन नळजोडण्या सवलतीच्या दरामध्ये देणे या योजनेस दिनांक ३१/०३/२०१२ पर्यंत मुदत वाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु ,**

ज्या सदनिकेत/इमारतीत या अगोदरच वैयक्तीक वैध नळजोडणी आहे, अशा ग्राहकांना त्यांची नळजोडणी जुन्या जलवाहिनीवरुन नवीन जलवाहिनीवर जलमापकासह विनामुल्य बदलुन देण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. सतिश चहाळ

महासभा ठराव क्र. :— १८ अ     दिनांक : २०/६/२०११

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १**:— उल्हासनगर शहरात केंद्र शासनाच्या राजीव आवास योजना राबविण्याप्रयोजनार्थ विविध सल्लागार नेमणे, सेवाभावी संस्था नेमणे, तांत्रिक सर्व्हेक्षणाकरीता समन्वयक या पदांवर ठोक वेतनावर भरती करणे व झोपडपट्टी विकास आराखडा तयार करणे.

**विषय क्र. २**:— अल्पसंख्यांक बहुलक्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

सूचकाचे नांव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

स्थगन प्रस्ताव

**विषय :—** मे. ॲन्थोनी वेस्ट हेण्डलींग या सफाई ठेकेदार, कामे शर्ती व अटीनुसार करीत नसल्याने शहरातील कचरा एक जेसीबी व दोन डम्पर लावून त्याचे देयक त्याच्या देयकातून अदा करण्याकरीता सूचना.

उल्हासनगर शहरात दररोज निर्माण होणारा कचरा उचलण्याचे ठेका महापालिकेने मे. ॲन्थोनी वेस्ट हेण्डलींग या संस्थेस शर्ती व अटीनुसार दिलेला आहे. परंतु महापालिकेने घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार काम करीत नसल्याचे अनेक तक्रारी येत आहेत. तसेच वॉर्डातील कच—यांचे खत्ते नियमित न उचलणे, डीडीटी फवारणी न करणे, कचरा कुंडया तुटलेल्या अवस्थेत इत्यादी अनेक तक्रारीच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

याबाबत संबंधीत ठेकेदारांना आगाऊ सूचना, त्याच्यासह शर्ती व अटीनुसार अंमलबजावणी करण्यास निर्देशीत करुन देखील अदयापपर्यंत कामात कोणतीही सुधारणा न झाल्याचे दिसून येत आहे.

तरी आपणांस विनंती करण्यांत येते की, दैनंदिन शहरातील जमा होणारा कचरा उचलण्याकरीता १ जेसीबी व २ डंम्पर लावून उचलण्यात यावा व त्याचे देयक मे. ॲन्थोनी वेस्ट हेण्डलींग, या कंपनीच्या देयकातून वजा करण्याबाबत दिनांक २०/६/२०११ रोजीच्या महासभेत प्रश्न उत्तरानंतर कामकाज स्थगित करुन यावर चर्चा करण्याबाबत सूचना

महासभा ठराव क्र. :— १८ ब                                        दिनांक : २०/६/२०११

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता शहरातील दैनंदिन कचरा उचलणारा ठेकेदार मे. ॲन्थोनी वेस्ट हेण्डलींग हे निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करत नसल्याने शहरात जमा होणारा दैनंदिन कचरा उचण्याकरीता जर सदरहु ठेकेदार एक जेसीबी व दोन डंम्पर लावत नसेल तर महापालिकेने एक जेसीबी व दोन डंम्पर लावुन कचरा उचलण्यास व त्याचे देयक कचरा वाहतुक ठेकेदार मे. ॲन्थोनी वेस्ट हेण्डलींग यांच्या देयकातुन वजा करुन घेण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :–** श्री. परमेश्वर बुडगे, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांचेविरुध्द क्रि. प्रा. को. १९७३ चे कलम १९७ अन्वये अभियोग दाखल करण्यास मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

श्री.परमेश्वर बुडगे, कनिष्ठ अभियंता,नगररचना विभाग यांचेवर अर्जदार श्री. अजित शंकरलाल भाटीया उल्हासनगर–३ यांनी उल्हासनगर पोलीस ठाणे येथे दि. २७/११/२०१० रोजी दिलेल्या तक्रारीवरुन उल्हासनगर पोलीस ठाणे गु.रं.नं २६७/१० भादवि कलम ३८७,३४१,४२०, ४६८,३४ सह १२० (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाच्या तपासकामी तात्कालीन नगररचनाकार उल्हासनगर महानगरपालिका श्री. अरुण गुरगुळे यांची बदली झाल्यानंतर ते अर्जित रजेवर असताना श्री.परमेश्वर बुडगे, कनिष्ठ अभियंता यांनी संगनमत करुन उल्हासनगर शहरातील बरेचसे बांधकाम परवाने मंजुरीस मदत केली याबाबत सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाच्या तपासकामी माहिती मिळणेकरिता ते कार्यालयात हजर न राहता अर्जित रजेवर निघून गेले . यास्तव त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ४ (१) ४ (२) मधील तरतुदींचा वापर करुन का.आ.क्र.उमपा/ साप्रवि/ मुली/ आस्था/२१२/२०११ दि. २०/१/२०११ अन्वये त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

निलंबित कर्मचारी श्री.परमेश्वर बुडगे यांना क्र. डीसीपी /झोन ४/उ'नगर/रिडर/२५६३/११ पोलीस उप आयुक्त, परि. ४ यांचे कार्यालय उल्हासनगर दि. २४/४/२०११ रोजीच्या पत्रान्वये श्री. अजित शंकरलाल भाटीया, वय ३५ वर्ष, धंदा– व्यापार,रा.६०१,६०२ रिजन्सी गार्डन, सपना गार्डन समोर, उल्हासनगर–३ यांनी दि. २७/११/२०१० रोजी उल्हासनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन उल्हासनगर पो.स्टे.गु.र.न. २६७/१०, भादविक ३८७,३४१,४२०,४६८,३४ सह १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल आहे.

तसेच क्र. डीसीपी/झोन४/उ'नगर/रिडर/२५८५/११ पोलीस उप आयुक्त, परि.४ यांचे कार्यालय उल्हासनगर दि. २५/४/२०११ रोजीच्या पत्रान्वये श्री. प्रकाश सुदरलाल तलरेजा, वय ४१ वर्ष, धंदा–व्यापार, रा.प्लॅट नं २९, तळमजला, बी विंग, हिल व्हयुव्ह को.ऑप हौसिंग सोसायटी, चौकजवळ उल्हासनगर–१ यांनी दि. १९/२/२०११ रोजी उल्हासनगर पो. ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन उल्हासनगर पो.स्टे.गु.र.न. ३२/११ भादविक ४२०,४६७,४६८,४७१,३४ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपी/लोकसेवक श्री. परमेश्वर बुडगे, वय ३७ वर्ष, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांना दि. २४/२/२०११ व दि. २५/२/२०११ रोजी अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्हयाचे तपासात त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा उपलब्ध झालेला आहे. सदर आरोपी हा लोकसेवक असल्याने संबंधित घटक प्रमुखांची कि.प्रो.को. १९७३ चे कलम १९७ अन्वये अभियोग दाखल करण्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, उल्हासनगर यांचेकडील दि. २४/४/२०११ व दि. २५/४/२०११ रोजीच्या पत्रान्वये निलंबित महापालिका कर्मचारी श्री. परमेश्वर बुडगे, वय ३७ वर्ष, उल्हासनगर महानगरपालिका यांचेविरुध्द कि.प्रो.को. १९७३ चे कलम १९७ अन्वये अभियोग दाखल करणेबबात परवानगी मागीतली आहे.

तरी श्री. परमेश्वर बुडगे,कनिष्ठ अभियंता यांना अभियोग दाखल करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये नियुक्ती प्राधिकारी म्हणुन मा. महासभा सक्षम आहे. म्हणुन संबंधित कर्मचा–यांच्या विरुध्द अभियोग दाखल करणेकामी मा. महासभेच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १९** **दिनांक:–२०/६/२०११**

सुचकाचे नाव :– श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके

ही महासभा उल्हासनगर पोलिस स्टेशन गु.र.न. २६७/२०१०, भादविक ३८७, ३४१, ४२०, ४६८, ३४ सह १२० (ब) व उल्हासनगर पोलिस स्टेशन गु.र.नं. ३२/२०११ भादविक ४२०, ४६७, ४७१ ३४

अन्वये गुन्हा दाखलाच्या सर्व कागदपत्र व पुराव्याच्या सखोल अभ्यासाअंती श्री. परमेश्वर बुडगे, कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग यांचे विरुध्द संबंधित घटक प्रमुखाची कि.प्रो.को. १९७३ चे कलम १९७ अन्वये अभियोग दाखल करण्याची मंजुरी देण्यापूर्वी महापालिका वकिलाचे अभिप्राय घेणे गरजेचे असून त्यांच्या अभिप्रायासह हा विषय पूढच्या सभेत प्रस्तुत करण्यास प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :—** १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २४/२/२०११ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

महासभा ठराव क्र.४५, दिनांक २०/१०/२०१० अन्वये पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा अतंर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणारे (१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले (२) श्री. अशोक सखाराम वायले (३) श्री. चंद्रभान गुरुनाथ वायले (४) श्री. राजेश ब्राम्हण तरे अशा ४ जणांना पाणी पुरवठा विभागात मंजुर/वॉलमन या पदी कार्यरत कर्मचारी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदावर (वर्ग—४) मान्यता दिलेली आहे. सदरची मुदत दिनांक २२/०२/२०११ रोजी संपुष्टात आलेली आहे.

तरी पाणी पुरवठा विभागाकडील दिनांक १३/०२/२०११ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत उमेदवारांचे कामाचे स्वरुप पहाता (१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले (२) श्री. अशोक सखाराम वायले (३) श्री. चंद्रभान गुरुनाथ वायले (४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांची सेवा दिनांक २२/०२/२०११ रोजी संपुष्टात आल्याने ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक २४/०२/२०११ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार नियुक्तीचे नवी करणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणुन मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २० दिनांक:—२०/६/२०११

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २४/२/२०११ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३:–** विशेष समित्यांची रचना करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येते व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येते. त्यानुसार महासभा ठराव क्र. ४७, दिनांक १३/११/२००९ अन्वये खालील नऊ विशेष समित्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

९. महसूल समिती

वरील विशेष समित्यांची नऊ महिन्याची मुदत दिनांक ३०/४/२०११ रोजी संपृष्टात येत आहे. प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल. महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | लोकभारती (स्वतंत्र गट) | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | ०८ | १७ | १६ | १२ | ६ | ५ | २ | १ |

| ७६ | = ८.४४ |
|---|---|
| ९ | |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण– ८.४४ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | ०९ / ७६ X ९ | = १.०६ | (६) | कॉंग्रेस | १६ / ७६ X ९ | = ०.७१ |
| (२) | लोकभारती (स्वतंत्र गट) | ०८ / ७६ X ९ | = ०.९४ | (७) | आरपीआय | ५ / ७६ X ९ | = ०.५९ |
| (३) | शिवसेना | १७ / ७६ X ९ | = २.०१ | (८) | म.न.से. | २ / ७६ X ९ | = ०.२३ |
| (४) | रा.का.पा. | १६ / ७६ X ९ | = १.८९ | (९) | अपक्ष | १ / ७६ X ९ | = ०.११ |
| (५) | भाजपा | १२ / ७६ X ९ | = १.४२ | | | | |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | २ | १ | १ | ५ |

यानंतर रिक्त राहणा—या चार जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.०६ (२) लोकभारती (स्वतंत्र गट) ०.९४ (३) शिवसेना ०.०१

(४) रा.का.पा. ०.८९ (५) भा.ज.पा. ०.४२ (६) कॉंग्रेस ०.७१

(७) आरपीआय ०.५९ (८) म.न.से ०.२३ (९) अपक्ष ०.११

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर लोकभारती (स्वतंत्र गट) भाजपा, कॉंग्रेस व आरपीआय या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | लोकभारती (स्वतंत्र गट) | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

<u>महासभा ठराव क्र:</u> २० अ <u>दिनांक:—२०/६/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

ही महासभा विशेष समित्यांची रचना करणेकामीचा प्रस्ताव पूढील सभेत घेण्याप्रयोजनार्थ या सभेच्या कामकाजातून वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. ४:–** श्री. राकेश एम छतलानी, अर्जदार यांचे मालकीची उल्हासनगर-५ येथिल यु.नं. १,५४,५५,५६,५८,५९, फ्लॉट नं. १५५७ शिट नं. ७३ व ८२ मधील एकुण ४३२४.३१ चौरस मिटर क्षेत्राची जमिन ही मुळ विकास योजनेनुसार हरित विभागातुन वगळुन रहिवास विभागात समावेश करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महानगरपालिकेचे मुळ मंजुर विकास योजनेत व प्रारुप विकास योजनेत किरकोळ फेरबदल करणे.

<u>प्रस्तावना</u>

**संदर्भ** :– १. श्री. राकेश एम. छुतलानी व श्री. राजेश एम. छुतलानी यांचा उल्हासनगर–५ मधील यु.नं. १, युनिट नं. ३ व ४, शिट नं. ८२, क्षेत्र १४७०.८७ चौ. मी. या जागेवरील अर्ज क्र. सी–२११३३४०९०००७७२७ दि. २९.१०.०९ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेला रहिवास प्रयोजनासाठीचा बांधकाम परवानगी प्रस्ताव.

२. नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१८१/०९/९३२ दि. १०.११.०९ अन्वये नामंजूर केलेला बांधकाम परवानगी प्रस्ताव.

३. संबंधित अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी यांचा मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, यांचेकडेस म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये दि. १२.११.०९ रोजीच्या अर्जान्वये दाखल केलेले अपिल.

४. शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र. टिपीएस/१२०९/ ३०८६/नवि–१२ दि. ११.०१.१० अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचा अपेक्षिलेला अहवाल.

५. नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका यांनी पत्र क्र. उमपा/नरवि/एसआर/९३/१० दि. ०२.०३.१० अन्वये कलम ४७ च्या अनुषंगाने दाखल अपिल प्रकरणांत शासनास सादर केलेला सविस्तर अहवाल.

६. शासनाने नगर विकास विभागाचे पत्र क्र. टिपीएस–१२०९/३०८६/प्र.क्र. ३२७/१०/नवि–१२ दि. २०.०९.१० अन्वये संबंधित अर्जदार श्री. राकेश छुतलानी यांनी कळविलेला अभिप्राय.

७. संबंधित अर्जदार श्री. राकेश छुतलानी यांनी मा. नगर विकास राज्यमंत्री साो. महोदय यांचेकडेस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करणेबाबत सादर केलेला दि. ०३.०८.१० रोजीचा अर्ज.

८. संबंधित अर्जदार श्री. राकेश छुतलानी यांचे दि. ०३.०८.१० रोजी मा. राज्यमंत्री साो. नगर विकास विभाग यांना लिहिलेल्या पत्राचे अनुषंगाने शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र. टिपीएस–१२०९/३०८६/प्र.क्र.३२७/१०/नवि–१२ दि. ०४.१०.१० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका व नगररचना संचालनालयाचा अपेक्षिलेला अहवाल

९. नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना मा. आयुक्त साो. उल्हासनगर महानगरपालिका यांचे मान्यतेने कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी पत्र क्र. उमपा/नरवि/स.जा./८०/१० दि. २२.१०.१० अन्वये शासनास सादर केलेला अहवाल.

१०. मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी मा. आयुक्त साो. यांना विषयाधीन आशयाच्या दि. १५.०४.११ रोजी सादर केलेल्या निवेदनावर मा. आयुक्त साो. यांनी दिलेले निर्देश.

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना ही शासन निर्णय क्र. टिपीएस–१२०१/३०१८५/सीआरपी दि. २७.०५.७४ अन्वये मंजूर केलेली असुन, ती दि. ०१.०७.७४ पासून अंमलात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेली उल्हासनगर शहराची सुधारीत प्रारुप विकास योजना ही म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सन २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि शासनाचे नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीएस–१२०२/८०६/सीआर–२००२/युडी–१२ दि. २६.०१.०४ अन्वये

उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र. हे उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र यामधुन वगळलेले असुन, उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करुन सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत आदेश दिलेले आहेत व त्याप्रमाणे सदरची विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत मुळ मंजूर विकास योजना व प्रारुप सुधारीत विकास योजना यातील कठोरतम तरतुदी लागू राहतील असेही नमूद केलेले आहे.

अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी व श्री. राजेश एम. छुतलानी यांचा उल्हासनगर—५ मधील यु.नं. १, युनिट नं. ३ व ४, शिट नं. ८२, क्षेत्र १४७०.८७ चौ. मी. या जागेवरील संदर्भ क्र. १ मध्ये नमुद अर्ज क्र. सी—२११३३४०९०००७७२७ दि. २९.१०.०९ अन्वये त्यांचे वास्तुविशारद श्री. दिपक सुखवानी यांचे मार्फत रहिवास प्रयोजनासाठी बांधकाम परवानगीचा प्रस्ताव उलहासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाला होता. तथापि विषयाधीन बांधकाम प्रस्तावाखालील जागा ही उल्हासनगर शहराच्या मुळ मंजूर विकास योजनेनुसार हरीत विभागात तसेच प्रारुप सुधारीत प्रसिध्द विकास योजनेनुसार ती सार्वजनिक सेवा (आरक्षण क्र.२३३) या आरक्षणाने बाधीत होत असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेने संदर्भ क्र. २ मध्ये नमुद दि. १०.११.०९ च्या पत्रान्वये सदरचा बांधकाम परवानगीचा प्रस्ताव हा नामंजूर केलेला आहे.

तद्नंतर संबंधित अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी यांनी मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस उल्हासनगर महानगरपालिकेने नामंजूर केलेल्या उपरोक्त बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये दि. १२.११.०९ रोजीच्या अर्जान्वये अपिल दाखल केलेले होते. त्यामध्ये अर्जदार यांनी उल्हासनगर शिट क्र. ७३ व ८२ मधील यु.नं. १, ५४,५५,५६,५८,५९ व प्लॉट नं. १५५७, एकुण ४३२४.३१ चौ.मी. या हरीत विभागात समाविष्ट जमिनीच्या सभोवतालील असलेल्या अनधिकृत बांधकामे व जागेचे संरक्षण होण्याच्या दृष्टिकोनातुन सदरची जमिन ही हरित विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत विनंती केलेली होती.
त्या अनुषंगाने शासनाचे संदर्भ क्र. ४ मध्ये नमुद दि. ११.०१.१० चे पत्रान्वये अपेक्षिल्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेचा सविस्तर अहवाल हा शासनास नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिकेने संदर्भ क्र. ५ मध्ये नमुद दि. ०२.०३.१० च्या पत्रान्वये सादर केलेला होता. त्यावर शासनाने संदर्भ क्र. ६ मध्ये नमुद दि. २०. ०९.१० चे पत्रान्वये अर्जदार यांना पुढीलप्रमाणे कळविलेले आहे.

**''आपली जागा व लगतचा परिसर हा मंजूर विकास आराखडयानुसार हरित पटट्यामध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे आपली जागा रहिवास विभागात समाविष्ट केल्यास स्पॉट झोनिंग होणार असल्याने नियोजनाच्या दृष्टिकोनातुन आपली मागणी मान्य करता येणार नाही.''**

तद्नंतर संबंधित अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी यांनी मा. राज्यमंत्री, महोदय, नगर विकास विभाग यांचेकडे त्यांचे मालकीचे उपरोक्त ४३२४.३१ चौ.मी. क्षेत्राची जमिन ही मुळ मंजूर विकास योजनेनुसार हरित विभागातुन वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करणेबाबत दि. ०३.०८.१० रोजीच्या संदर्भ क्र. ७ मध्ये नमुद पत्रान्वये विनेती केलेली आहे. सदरच्या अर्जामध्ये संबंधित अर्जदार यांनी प्रामुख्याने असे नमुद केलेले आहे की, ''उल्हासनगर—५ येथील शिट क्र. ७३ व ८२ मधील यु.नं. १,५४,५५,५६,५८,५९ व प्लॉट नं. १५५७, एकुण ४३२४.३१ चौ.मी. जमीन ही त्यांचे मालकीची आहे व महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्येची घनता जास्त असल्याने रहिवास विभागाचे क्षेत्र हे लोकसंख्येच्या मानाने अपूरे आहे. तसेच प्रस्तावाखालील जमिनीलगत असलेल्या हरीत पटट्यातील जमिनीमध्ये काही इमारती व चाळी यांचे अनधिकृत बांधकामे झालेले आहे व अनधिकृत बांधकामे नियमाधीन अध्यादेश २००६ नुसार त्यातील बऱ्याचशा बांधकामांना नियमित करुन मान्यता देखील देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर जमिनीच्या सभोवतालील हरीतपटट्यातील परिसरात संपूर्णपणे लोकवस्ती असल्याने तो भाग हरीतपटट्यात समाविष्ट करणे योग्य होणार नाही. त्यामुळे परिसरातील अनधिकुत बांधकामांना आळा घालण्यासाठी त्यांचे मालकीची हरीत पटट्यातील जमिन ही म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ

फेरबदल करुन हरीत विभागातुन वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत यावी जेणेकरुन शहराच्या विकासास हातभार लागून जनतेच्या निवासाची निकड दूर होईल.''

संबंधित अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी यांनी मा. राज्यमंत्री, महोदय, नगर विकास विभाग यांना लिहिलेल्या उपरोक्त दि. ०३.०८.१० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासनाचे नगर विकास विभागाचे संदर्भ क्र. ८ मध्ये नमुद दि. ०४.१०.१० रोजीच्या पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिकेचा सविस्तर अहवाल अपेक्षिलेला होता व नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका यांनी त्या अनुषंगाने मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने संदर्भ क्र. ९ मध्ये नमुद केलेल्या पत्र क्र. उमपा/नरवि/सजा/८०/१० दि. २२.१०.१० अन्वये शासनाचे नगर विकास विभागास सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. **मात्र त्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश हे उल्हासनगर महानगरपालिकेस आजमितीस प्राप्त झालेले नाहीत.**

आता मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी संदर्भ क्र. १० मध्ये नमुद केलेल्या दि. १५.०४.११ रोजीच्या निवेदनाद्वारे मा. आयुक्त सो. यांना अर्जदार श्री. राकेश एम. छुतलानी यांचे मालकीचे उपरोक्त हरित विभागातील जमिन ही रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेचा प्रस्ताव हा सादर करणेबाबत संबंधित विभागास आदेश होणेकामी विनंती केलेली आहे व सदरच्या निवेदनावर मा. आयुक्त सो., उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदरचा प्रस्ताव हा महासभेपुढे सादर करणेत येत आहे.

त्यानुसार अर्जदार यांचे शिट ७३ व ८२ मधील यु.नं. १,५४,५५,५६,५८,५९ व प्लॉट नं. १५५७, एकुण ४३२४.३१ चौ.मी. जमीनीपैकी प्रारुप प्रसिध्द सुधारीत विकास योजनेतील सार्वजनिक सेवा (आरक्षण क्र. २३३) या आरक्षणाने बाधीत २०००.०० चौ. मी. क्षेत्र हे त्याच आरक्षणासाठी कायम ठेवुन उर्वरित २३२४.३१ चौ.मी. एवढे मुळ मंजूर विकास योजनेत हरीत विभागात (प्रारुप प्रसिध्द सुधारीत विकास योजनेनुसार रहिवास विभाग) समाविष्ट जमिन ही हरीत विभागातुन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाबाबतची कार्यवाही ही वर सविस्तरपणे सादर केल्यानुसार शासनाचे संदर्भ क्र. ६ मध्ये नमुद दि. २०.०९.१० रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला अहवालावर शासनाच्या निर्णय प्रलंबित असतांना सुरु करावी किंवा कसे यासाठी मा. महासभेचे निर्णयार्थ सादर.

सदरहू बाब मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवून कृपया मान्यता घ्यावी.

<u>महासभा ठराव क्र:</u> २१ <u>दिनांकः—२०/६/२०११</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे व कायदा प्रक्रिया तरतुदी अधिन राहुन उल्हासनगर—५ येथिल यु.नं. १,५४,५५,५६,५८,५९, फ्लॉट नं. १५५७ शिट नं. ७३ व ८२ मधील एकुण ४३२४.३१ चौरस मिटर क्षेत्रातील बाधीत जमिन ही मुळ विकास योजनेनुसार हरित विभागातुन वगळुन रहिवास विभागात समावेश करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महानगरपालिकेचे मुळ मंजुर विकास योजनेत व प्रारुप विकास योजनेत आवश्यकतेप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

ल्या कारणांमुळे व म.प्रा.व.न.र. अधिनियमातील कायदा प्रक्रिया तरतुदीच्या अधिन राहून उल्हासनगर–५ येथिल शिट ७३ व ८२ मधील यु.नं. १,५४,५५,५६,५८,५९ व प्लॉट नं. १५५७, एकुण ४३२४.३१ चौ.मी. जमीनीपैकी प्रारुप प्रसिध्द सुधारीत विकास योजनेतील सार्वजनिक सेवा (आरक्षण क्र. २३३) या आरक्षणाने बाधीत २०००.०० चौ.मी. क्षेत्र हे त्याच आरक्षणासाठी कायम न करता उर्वरित २३२४.३१ चौ.मी. एवढे मुळ मंजूर विकास योजनेत हरीत विभागात (प्रारुप प्रसिध्द सुधारीत विकास योजनेनुसार रहिवास विभाग) समाविष्ट जमिन ही हरीत विभागातुन रहिवास विभागात समाविष्ट करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महानगरपालिकेचे मुळ मंजुर विकास योजनेत व प्रारुप विकास योजनेत आवश्यकतेप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ५:— उल्हासनगर शहरात केंद्र शासनाच्या राजीव आवास योजना राबविण्याप्रयोजनार्थ

विविध सल्लागार नेमणे, सेवाभावी संस्था नेमणे, तांत्रिक सर्व्हेक्षणाकरीता समन्वयक या पदांवर ठोक वेतनावर भरती करणे व झोपडपट्टी विकास आराखडा तयार करणे.

## प्रस्तावना

सन २००१च्या जनगणेनुसार देशात सुमारे २८५.३५ दक्ष लक्ष म्हणजे देशाच्या एकुण लोकसंख्येच्या २७.८ टक्के लोक शहरात राहात असुन स्वांतत्र्यांनंतर तिप्पट वाढ झाली असुन शहरी भागात रोजगार उपलब्ध होत असल्याने शहरी भागातील लोकसंख्येत ५ पट वाढ झालेली आहे. शहरी भागातील वाढलेल्या लोक संख्येने शहरात वास्तव्य करणा—या गरीब जनतेच्या लोक संख्येत सुध्दा वाढ झालेली आहे. शहरी भागात शहरामध्ये गरीब जनतेस किफायतीदरात घरे उपलब्ध होवू शकत नसल्याने त्यांना आवासा करीता झोपडीचा वापर करावा लागतो. त्यामुळे शहरातील मोकळया जागेवर अनाधिकृत रित्या झोपडपटटयाची वाढ होते.

शहरातील झोपडपटटी वासियांच्या वाढत्या लोकसंख्ये मुळे शहरातील मुलभुत सोयी व सुंविधानवर अतोनात ताण पडत आहे. झपाटयाने शहरीकरण होत असल्याने निर्माण झालेलया प्रचंड समस्येवर मात करण्यासाठी तर्क सुसंगत नागरीकरण धोरण,कार्यक्रम आखून त्याची अमंलबजावणी करणे आवश्यक झाले आहे. शहरी भागातील झोपडपटटी वासियांचे जिवनमाण उंच्चविण्याचा प्रयत्नाचा एक भाग म्हणून आरोग्यास अपायकारक अशा परिस्थितीत राहणा—या झोपडपटटी वासियांनसाठी जवाहार लाल राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत शहरी गरीबांन करीता मुलभुत सुविधा पुरविण्याचा कार्यक्रम राबविण्याचा केंद्र शासना मार्फत निर्णय झाला होता परंतु या योजनेचा कालावधी सन २०१२ मध्ये पुर्ण होत असल्याने पुढे या योजनेतुन झोपडपटटी विकास कामाकरीता निधी उपलब्धतेची शक्यता कमी झालेली आहे. त्यामुळे झोपडपटटी कार्यक्रम विकासा करीता केंद्र शसना मार्फत राजीव गांधी आवास योजना (RAY) राबविण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

## कार्यक्रमाचे धोरण

राजीव गांधी आवास योजना (RAY) हा कार्यक्रम राबविण्या करीता निवडलेल्या शहरानी २० वर्षाच्या कालावधी करीता झोपडपटटी विकासाच्या वस्तूनिष्ट आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या धोरणे कार्यक्रम व निधीच्या उपलब्धे बाबतची तरतूद असेल या आराखडयाच्या आधारे जमिनीच्या मूलभूत वापर आणि सेवा, शहरी दळणवळण आणि पर्यावरण या बाबीची सांगड घालून योजनेच्या कालावधी करीता झोपडपटटी विकास आराखडा (Slum Deveopment Plan) तयार करावयाचे आहे. राजीव गांधी आवास योजना (RAY) या योजने अंतर्गत शसनाचा निधी मिळण्यास पात्र होण्यासाठी झोपडपटटी विकास आराखडा (Slum Deveopment Plan) तयार करणे आवश्यक आहे.

## जवाहार लाल राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत शहरी गरीबांन करीता मुलभुत सुविधा पुरविण्याचा कार्यक्रम राबविणे.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियानाअंतर्गत उल्हासनगर शहराचा विकास आराखडा सन २००७ मध्ये तयार करण्यात आला. या आराखडयात इतर विकास कामांसोबत शहरातील झोपडपट्टयांचा विकास करणे करीता शहरी गरीबांकरिता मुलभूत सुविधा बीएसयुपी कार्यक्रमांचा समावेश होता. त्याअनुषंगाने केंद्र शासनामार्फत राहुलनगर व सरस्वतीनगर यांचे शहरी

गरीबां करिता योजना मंजूर करण्यात आली आहे. परंतु या योजनेचा कालावधी सन २०१२ पर्यंत असल्याने पुढे या अभियानाअंतर्गत योजनांना मंजूरी मिळण्याची शक्यता कमी आहे.

## राजीव गांधी आवास योजना.

त्यामुळे केंद्र शासना मार्फत बीएसयुपी धरतीवर शहरी गरीबांना मुलभूतसेवा पुरविणे, शहरे झोपडपट्टीमुक्त करणे व शहरात भविष्यात झोपडपट्टया निर्माण होणार नाही. या बाबींचा विचार करुन सन २००९—२०१० मध्ये केंद्रशासना मार्फत राजीव आवास योजना राबविण्याचे ठरविले असून ही योजना राबविण्याआधी पहिल्या भागात शहराचा झोपडपट्टी आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शक सूचना केंद्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आल्या आहे. सदर मार्गदर्शक सूचनानुसार झोपडपट्टी विकास आराखडा तयार करणेसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे. महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी विकास आराखडा तयार करण्यासाठीचे रु.२.५२ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडे मंजूरीसाठी सादर केले आहे व या पोटी रु.३५.९७ लक्ष रकमेचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

सदर शहराच्या विकासाबरोबर शहरी गरीबांचा विकास करणे त्यांचे जीवनमान उंचावणे त्यांना सर्व मुलभूत सोई सुविधा पुरविणे गरजेचे आहे. त्यामुळे शहरातील आरक्षित जागेवरील अंतिक्रमण हटवून त्या जागांचा विकास होण्यास मदत होणार आहे. त्याकरिता महानगरपालिकेने या योजनेत सहभागी होणे गरजेचे आहे.

## उल्हासनगर शहरातील झोपडपटटयाची सदयस्थिती

उल्हासनगर महापालिका क्षेत्रात एकुण ४८ घोषित व ९१ अघोषित झोपडपट्टया आहेत. त्यात अंदाजे ३०,००० झोपडया असून एकुण १,५०,००० नागरिक रहात आहेत. राजीव आवास योजनेच्या अंमलबजावणीपूर्वी राज्य शासनाकडून तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील शहरे झोपडपट्टीमुक्त कशी करता येईल याकरिता कृती आराखडा तयार करण्याकरिता सूचना या मार्गदर्शक सूचीमध्ये दिलेल्या आहेत. सदर कृती आराखडयाचे प्रामुख्याने दोन भाग असतील पहिल्या भागात अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचा दर्जा उंचावणे व दुसऱ्या भागामध्ये नव्याने झोपडपट्टया होणार नाहीत याकरिता उपाययोजना करणे.

## योजनेची अंमलबजावणी

राजीव आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी झोपडपट्टीमुक्त शहर कृती आराखडयात झोपडपट्टी पुर्नविकास/पुर्नवसन पुढील बाबींवर आधारभूत असेल १) सर्व घोषित—अघोषित झोपडपट्टयांचे सर्वेक्षण २) झोपडपट्टयांची आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अद्यावत नकाशे तयार करणे. ३) झोपडपट्टयांचे स्थानिक भौगोलिक तथा सामाजिक—आर्थिक सर्वेक्षण करुन त्यांची एकत्मिक माहिती तयार करणे. ४) प्रत्येक झोपडपट्टी पुर्नविकासाचे संपूर्ण शहर स्तरावर स्वतंत्र आकृतीबंध (Model) तयार करणे. तसेच दुसऱ्या भागात नव्याने झोपडपट्टया होणार नाहीत याकरिता उपाययोजना करणे.

## योजनेची कार्यपदधती.

झोपडपट्टीमुक्त शहर करण्यासाठी खालील कार्यपध्दती आवश्यक आहे.

i) NRSC / ISRO याचेकडून कार्टोसॅट ।। /अद्यायावत सॅटेलाई इमेज प्राप्त करुन संपुर्ण शहर तथा आजुबाजूच्या भागाचा आधारभूत नकाशा (Base Map)तयार करणे.

ii) संपुर्ण शहराचे उपग्रहाने घेतलेलया छायाचित्रात शहरातील सर्वझोपडपट्टी विभाग ओळखून त्याची माहिती घेवून सूची तयार करणे.

iii) शहारातील प्रत्येक भागातील उपलब्ध रिकाम्या जमिनींची तसेच संभावित रिकामी करता येणाऱ्या जमिनीची सूची बनविणे व त्याचा उपयोग झोपडपट्टी पुर्नविकास पुर्नवसन करणेसाठी करणे.

iv) संपुर्ण शहराचा झोपडपट्टी विकास आराखडा व झोपडपट्टीमुक्त शहर आराखडा तयार करण्यापूर्वी शहरात प्रथम संपूर्ण शहराच्या आतील तसेच बाहय भागाचे उपग्रहाद्वारे घेतलेल्या छायाचित्रामध्ये झोपडपट्टयांची (Identification)ओळख करुन घेतल्यानंतर अशा झोपडपट्टयांच्या जागेचा टोटल स्टेशन सर्वेक्षणने एकत्र भूस्तरीय Spatial Data, भूखंड सीमांसह Spatial माहितीचे संकलन, रस्ते, मल:निस्सारण, पावसाळी पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था, जलवाहिन्या इत्यादी व्यवस्थांचे उपग्रह छायाचित्रांवर सुपर इंपोज करणे व संपूर्ण माहिती GIS प्रणालीमध्ये टाकणे यासाठी NRSC / ISRO अथवा अन्य तांत्रिक संस्थांचे / एजन्सीच्या तांत्रिक भागिदारांची मदत घेणे.

v) शहरामधील कोणकोणती सेवाभावी अशासकीय संस्था / स्थानिक मंडळे आहेत. त्यांची माहिती घेऊन त्यांची नियुक्ती करणे अशा संस्था व शहरातील झोपडपट्टयांच्या सर्वेक्षणाच्या वेळी मार्गदर्शन देतील. तसेच जनसमुदायाचे समर्थन मिळवून देतील. (प्रत्येक वेगवेगळया झोपडपट्टयांमध्ये एका पेक्षा अधिक सेवाभावी अशासकीय संस्था/स्थानिक मंडळे असू शकतील) या सर्व सेवाभावी संस्थाचा सहयोग झोपडपट्टी विकास योजना तयार करतेवेळी करावयाच्या सर्व्हेक्षण कार्यात आणि व संपर्कासाठी घेता येऊ शकतो.

vi) प्रशिक्षकांना प्रशिक्षक सर्वेक्षण कर्मचा—यांना / प्रचारकांना प्रशिक्षण दिल्यानंतर राष्ट्रीय भवन निर्माण संगठन (Nationt Building Organisation- NBO)यांच्या सहकार्याने आवास तथा शहरी गरीबी उपशमन मंत्रालयाद्वारा तयार केलेल्या सविस्तर प्रपत्राच्याआधारे (परिवर्तनासह अथवा परिवर्तनाा शिवाय) झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करणे. समुदायाचे समर्थन घेण्यासाठी संबंधित झोपडपट्टयांमधील अथवा बाजूच्या झोपडपट्टयांमधील प्रचारकांची मदत घेणे.

vii) उपरोक्त सर्वेक्षणाच्या आधारे बायोमेट्रीक ओळख माहिती घेणे (युनिक आयडेंटीटी अथोरिटी ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वाच्या अधीन राहून)

viii) झोपडपट्टी सर्व्हेक्षणातून उपलब्ध झालेल्या माहितीचे केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या वेब सक्षम MIS प्रणालीत माहिती समाविष्ट करणे, संकलित करणे. संपुर्ण शहर स्तरावर व त्यानंतर राज्यस्तरावर अशी Data Base आणि वेब बेस ठरवून माहिती संकलित करुन अहवाल तयार करणे. एम.आय.एस.मुळे संतुलित स्लम व स्लम परिसर सुचना पध्दत तयार करण्याकरिता एम.आय.एस. पध्दती तयार करण्यासाठी आवास मंत्रालयाद्वारा मार्गदर्शन व सॉफ्टवेअर दिले जातील.

ix) स्लम MIS ला GIS नकाशांमध्ये समाविष्ट करणे. ज्यामुळे GIS सक्षम झोपडपट्टी सूचना पध्दती तयार करता येऊ शकाते. ज्याचा उपयोग संपुर्ण शहर / क्षेत्र आधारित दृष्टीकोनातून सार्थक झोपडट्टी विकासयोतना तथा झोपडपट्टी मुक्त शहर योजना तयार करण्याकरिता होऊ शकतो. (जी. आ.एस. प्लॅटफॉर्म तयार करणे व एम.एस.आय.सह त्यांचे विलय करण्याकरिता) आवास तथा शहरी गरिबी उपशमन मंत्रालय द्वारा मार्गदर्शक तत्वे जारी केले जातील आणि सॉफ्टवेअर पुरविले जातील.

x) प्रत्येक झोपडपट्टीसाठी झोपडपट्टी पुर्नविकास योजना पी.पी.पी विकास, फक्त मुलभूत सुविधा योजना, राजीव आवास सोसायटी द्वारे सामुदायिक आधारित विकास इत्यादी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत समुदायास ही सामिल करुन घेतले पाहिजे. याकरिता सामुदायिक समर्थन घ्यावे लागणार आहे. तसेच मॉडेल तयार करण्यासाठी लाभार्थी समुदायाशी विचारविनिमय करावे लागणार आहे. प्रत्येक स्लम पुर्नविकास योजनेची प्रत्येक गतिविधीसाठी निश्चित कालावधी ठरविणे आवश्यक राहील.

xi) झोपडपट्टीमुक्त शहर योजना सर्व झोपडपट्टीसाठी विकास योजना तसेच भविष्यात झोपडपट्टया रोखण्यासाठी कार्यक्षेत्र ठरवून त्याच्यावर आधारित असेल. यामध्ये शहरी गरीबांसाठी भूखंड व घर बांधणीसाठी (LIG, EWS) आरक्षणे ठेवणे आवश्यक आहे. झोपडपट्टी मुक्त शहराच्या उद्देशाच्या प्राप्तीसाठी गतीविधींचे वेळापत्रक प्रत्येक गतीविधीची संबंधित माहिती वित्तीय अनुदान हे योजनेमध्ये समाविष्ट असेल.

यासाठी १)जी.आय.एस. तज्ञ २) एम.आय.एस. तज्ञ ३) टाऊनप्लानिंग तज्ञ, ४) समाजविकास तज्ञ, ५) प्रकल्प/अभियांत्रिकी तज्ञ, ६)प्रशिक्षण समन्वयक इत्यादि पदे ठोक पध्दतीने भरण्याबाबत देखील मार्गदर्शक सुचना आहेत. वर उल्लेख करण्यात आलेली शहरी गरीबांकरिता राजीव आवास योजनेच्या मार्गदर्शक अटी व शर्ती स्विकारुन या कार्यक्रमात सहभागी होण्यास महासभेची मान्यता मिळणेस्तव प्रस्तावित आहे.

तसेच राजीव आवास योजनेचा आवाका व अंमलबजावणीची कार्यपध्दती पहाता केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शकसूचीतील बाबींची पुर्तता करणारे सल्लागार, वास्तुविशारद इत्यादिंची नियुक्ती करणे बाबतची कार्यवाही करण्यात येत असून सदर योजनेचा कृती आराखडा त्वरीत शासनाकडे सादर करण्याचे आहे. महाराष्ट्र गृह निर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण येथे दि.२८/०४/२०११ व दि.१२/०५/२०११ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये सूचित केल्यानुसार अंमलबजावणीसाठी कालमर्यादेसह कृती आराखडा दिलेला असून माहे ऑक्टोबर २०११ पूर्वी सविस्तर झोपडपट्टी विकास आराखडा शासनाला सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने मा. महासभेची मान्यता गृहीत धरुन सल्लागार नियुक्ती निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. यासोबत आपल्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

तरी केंद्र शासनाने निर्गमित केलेली राजीव आवास योजना उल्हासनगर शहरामध्ये राबविण्यासाठी व त्याअनुषंगाने विविध सल्लागार नेमणे, सेवाभावी संस्था (NGO) नेमणे, तांत्रिक सर्व्हेक्षणाकरीता १) एम.आय.एस.तज्ञ २) जी.आय.एस.तज्ञ ३) टाऊनप्लॅनिंग तज्ञ ४) समाज विकास तज्ञ

५) प्रकल्प/अभियांत्रिकी तज्ञ ६) क्षमता निर्माण/प्रशिक्षण समन्वय या पदावर ठोक वेतनावर भरती करणे उल्हासनगर शहराचा सध्या तयार होत असलेला विकास आराखडयास (Development Plan) मध्ये शहरातील सर्व झोपडपट्टी पुर्नविकासासाठी भूखंड आरक्षित करणे, तसेच भविष्यात शहरी गरीबांकरिता (LIG, EWS) गृहबांधणी, तात्पुरते निवारे यासाठी आरक्षित भुखंड राखून ठेवणे योकरिता नगररचना विभागास आदेश होणे इत्यादी बाबींसाठी मा महासभेस माहिती होणे व मान्यता घेणेकरीता विषय पटलावर ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे मा. आयुक्तांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यता घेणेकरीता सविनय सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> २२ <u>दिनांक:—२०/६/२०११</u>

सुचकाचे नाव :—श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर शहरात केंद्र शासनाचे राजीव गांधी आवास योजना राबविण्या प्रयोजनार्थ विविध सल्लागार नेमणे, सेवाभावी संस्था (NGO) नेमणे, तांत्रिक सर्व्हेक्षणाकरीता १) एम.आय.एस.तज्ञ २) जी.आय.एस.तज्ञ ३) टाऊनप्लॅनिंग तज्ञ ४) समाज विकास तज्ञ ५) प्रकल्प/अभियांत्रिकी तज्ञ ६) क्षमता निर्माण/प्रशिक्षण समन्वय या पदावर ठोक वेतनावर भरती करणे, उल्हासनगर शहराचा सध्या तयार होत असलेला विकास आराखडयास (Development Plan) मध्ये शहरातील सर्व झोपडपट्टी पुर्नविकासासाठी भूखंड आरक्षित करणे, तसेच भविष्यात शहरी गरीबांकरिता (LIG, EWS) गृहबांधणी, तात्पुरते निवारे यासाठी आरक्षित भुखंड राखून ठेवणे योकरिता नगररचना विभागास आदेश होणे इत्यादी बाबींसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. ६ :–** अल्पसंख्यांक बहुलक्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरासाठी संदर्भिय शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम वर्ष २०१०–११ करीता रु.२०.०० लक्ष इतके अनुदान मंजूर केलेले असून तसे विकासकामाचे प्रस्ताव तयार करणेकरीता संदर्भिय शासन निर्णयानुसार कळविले होते.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील प्रस्तावित ०८ कामांचे एकूण रु.२७,९८,९००/– एवढया कामांचे प्रस्ताव संदर्भिय शासन निर्णयातील मार्गदर्शक तरतूदींनुसार तयार करुन मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्राकलनांच्या मंजूरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी या कार्यालयाकडील पत्र क्र.उमपा/साबांवि/शअ/१८२ दिनांक १८/०३/२०११ अन्वये पाठविण्यात आलेले आहेत. (सोबत ०८ कामांची यादी जोडत आहे.)

तरी सदर योजनेअंतर्गत करावयाच्या रु.२७,९८,९००/– इतक्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यतेसाठी मा.महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: २३ दिनांक:–२०/६/२०११

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतिश चहाळ

ही महासभा सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम २०१०–११ अंतर्गत ८ कामांच्या रुपये २७,९८,९००/– च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# अल्पसंख्यांक बहुल योजनेअंतर्गत करावयाच्या कामांची यादी

| अ.क्र. | प्रभाग क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ५ | प्रभाग क्र. ०५ मधील गुलशननगर मुस्लिम वस्तीमध्ये जुने शौचालय तोडून नविन शौचालय बनविणे | ९९९००० |
| २ | ६ | प्रभाग क्र. ०६ उल्हासनगर–१ मधील बालक्रिष्णा नगर येथिल अन्सारी निवास जवळ, जावेमुन्सी निवास, निजाम भगवान निवास, मुस्लिम वस्ती, मस्जिद एरिया या ठिकाणी सीसी. पेव्हमेंट नाली व पेव्हरब्लॉक बसविणे. | ३००००० |
| ३ | ४३ | प्रभाग क्र. ४३, उल्हासनगर–३मधील मजीद जवळील परिसरात सम्राट अशोक नगर येथे पेव्हमेंट रोड, नाली बनविणेबाबत. | ३००००० |
| ४ | ३० | प्रभाग क्र. ३०, उल्हासनगर–३ येथिल एकता कॉलनी येथे पेव्हमेंट रोड, नाली बनविणेबाबत | २००००० |
| ५ | १० | उल्हासनगर–३, वार्ड क्र. १० येथिल मिनाताई ठाकरे नगर याठिकाणी सीसी पॅसेज, पेव्हर ब्लॉक आणि नाली बनविणे. | १५०००० |
| ६ | ७ | उल्हासनगर–३, वार्ड क्र. ७, इंदिरानगर याठिकाणी सीसी पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | २००००० |
| ७ | २८ | उल्हासनगर–३, वॉर्ड क्र. २८, भाऊजीनगर, पंचशिल नगर याठिकाणी सीसी पॅसेज, पेव्हरब्लॉक आणि नाली बनविणे. | १५०००० |
| ८ | ६८ | उल्हासनगर–५, प्रक्र. ६८ मधील महात्मा फुलेनगर, पटेलनगर, ओमनगर मध्ये विविध ठिकाणी सीसी पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे | ४९९९०० |
| | | एकुण | २७९८९००/– |